# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २९-९-२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिंनाक २९/९/२०११ रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१.१० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला उपआयुक्त (म) श्री. अजय चारठाणकर ,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री. शिंदे राजु रामराव
३. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१६. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१७. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
२२. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२३. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२४. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
२५. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत

२६. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२७. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२८. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२९. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
३०. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
३१. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
३२. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
३३. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३४. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३५. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३६. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३७. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३८. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३९. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
४०. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
४१. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
४२. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४३. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
४४. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४५. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४६. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४७. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४८. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४९. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
५०. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५१. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५२. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५३. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी
५४. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५५. स.स.श्री.खान आगा मिया खान

५६. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५७. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५८. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५९. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
६०. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
६१. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
६२. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
६३. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६४. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६५. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६६. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
६७. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६८. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७०. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७१. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७२. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७३. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७४. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७५. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७६. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
७७. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७८. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७९. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
८०. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
८१. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८२. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८३. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
८४. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
८५. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
०४. स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री. त्रिंबक तुपे : अगोदर विषय पत्रिका घेण्यात यावी त्यानंतर चर्चेसाठी वेळ दयावा.

**विषय क्र. ४५७ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकूण ३१ पदे मंजुर असून २४ पदे भरण्यात आलेली आहे व उर्वरित ०७ पदांची दि.२१.६.२०११ रोजी जाहिरात देण्यात आलेली आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या १२ लाखाच्या जवळपास असल्याची शक्यता आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार वैद्यकीय अधिकारी संवर्गातील अस्तित्वात असलेली पदे कमी आहेत. भविष्यामध्ये महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत आरोग्य केंद्र व रुग्णालय वाढणार आहेत. त्यामुळे महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी संवर्गाची पदे वाढविणे गरजेचे आहे.

करीता महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी या संवर्गाची वाढीव ०३ पदे मंजूर करुन तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद:-**

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रस्ताव ठेवत असतांना सन २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या १२ लाखाच्या जवळपास असल्याची शक्यता आहे त्यामूळे वाढत्या लोकसंख्येचा विचार करून भविष्यात महापालिकेच्या आरोग्य विभागा मार्फत आरोग्य केंद्र व रूग्णलय वाढविण्याची गरज आहे त्यानुसार अस्थापनेवर या संवर्गातील पदे वाढविणे गरजेचे आहे असा प्रस्ताव ठेवला व तो मंजूर करून शासनाकडे पाठविण्यासाठी विचारार्थ ठेवलेला आहे.आरोग्य विभागाची जी मंजूर पदे ती माझ्या माहितीनुसार पुर्ण भरलेली नाही आहे वैद्यकीय अधिकारी संवर्गाची ३१ पदे मंजूर आहे २४ त्यावर कर्मचारी कार्यरत आहे ७ पदे रिक्त आहे ज्या पदांना मंजूरी आहे त्यातील पदे रिक्त असतांना ३ अतिरिक्त पद वाढविण्याचा प्रस्ताव कशाच्या अधारे , कशासाठी ,कोणासाठी दिला प्रश्न हा आहे की आरोग्य विभागाची माहिती अस्थापनाकडे कशी विषय संबधीत विभागाकडे जायला पाहिजे त्यांचे माध्यमातून यायला पाहिजे.संपुर्ण पदे का भरलेली नाही पदे भरत असतांना बिंदू नामावली नुसार काय आहे राखीव पदे किती ओबीसी मध्ये किती व इतर संवर्गातील पदे राखीव मध्ये किती भरलेली आहे सविस्तर माहिती दयावी.

श्री.सुशिल खेडकर :आरोग्य अधिका-या मार्फत या पदाची कशा प्रकारची मागणी केली लोकसंख्येची शक्यता वर्तविली जाते`लोकसंखेच्या तुलनेत आरोंग्य केंद्र आहेत का किंवा त्या बाबतीत काय नियोजन केले जर नियोजन नसेल तर कर्मचा-यांना बसून ठेवणार का ?

श्री.संजय केनेकर :ज्या विभागाकडून प्रस्ताव यायला पाहिजे तेथून आलेला नाही. आरोग्य केंद्र किती ७ रिक्त पदे भरलेली नसतांना ३ पदाचा प्रस्ताव आला एकूण डॉक्टर किती त्यांचेवर कोणती जबाबदारी दिली इतर कोणती जबाबदारी दिली ज्या कामासाठी पदे मंजूर केली त्याच कामासाठी ते डॉक्टर आहेत का इतरत्र जबाबदारी दिली आहेत का डॉक्टरची पदे भरून त्यांना इतर जबाबदा-या देणार असेल तर आता पदे भरून त्यांना कोणत्या जबाबदारी देणार आहे आहे..

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

अस्थापना अधिकारी-१ : अस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी ही ३१ पदे मंजूर आहे ७ पदे रिक्त आहे त्या संदर्भात जाहिरात दिलेली आहे ११-७-२०११ पर्यत त्यांना अर्ज करण्याची मुभा होती त्यानंतर मा.आयुक्त यांचे निवासस्थानी बैठक झाली त्यामध्ये तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले की भविष्यात गरज लक्षात घेता आणखी ३ वाढीव डॉक्टराची आवश्यकता आहे तसा प्रस्ताव मंजूर करून आपण शासनाकडे पाठवावा यास जो ही ४-६ महिण्याचा कालावधी लागेल पदे मंजूर झाल्यानंतर ३ केंद्र सुरू करावयाची होती.त्यासाठी त्यांनी प्रस्ताव दयावा सांगितले होते त्यानुसार प्रस्ताव ठेवला .७ पदे रिक्त आहे त्याची जाहिरात दिली .

श्री.काशिनाथ कोकाटे :७ पदे किती दिवसापासून रिक्त आहे.ही ३ पदे व रिक्त असलेली ७ पदे कोणत्या संवर्गातील आहे.यापूर्वी जी कार्यवाही केली ती बिंदू नामावली नुसार केली का ,या बाबत कोर्टात कन्टेम झाले का मा.न्यायालयाचा अवमान झाला का खुलासा करावा.

अस्थापना अधि.-१ :७५ टक्के पदे ही एमबीबीएस व २५ टक्के ही बीएचएमएस यातून भरावयाची आहे त्या संदर्भात कोर्टात याचिका दाखल झालेली होती ती निकाली निघाली आहे आता बिंदू नामावलीनुसार आता ३१ मार्च २०११ ला आपण पूर्ण तपासून घेतले बिंदू नामावलीनुसारच ही पदे जातील मागच्या वेळेस जे डॉक्टर होते ०२ डॉक्टरांनी राजीनामा दिला आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :जे राजीनामा देवून गेले त्यांनी का व कशासाठी राजीनामा दिला

अस्थापना अधि-१ :त्यांचा पीजी साठी नंबर लागला होता त्यांनी २ वर्षासाठी लिव मागीतली होती ती आपण दिली नाही

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रस्ताव कोणत्या तारखेला ठेवला पदे कोणत्या संवर्गासाठी असणार आहे ज्या संवर्गासाठी पदे होती त्यांना न देता इतर घटकासाठी दिलेली आहेत का.बिंदू नामावली आम्हाला माहित आहे इतकी वर्ष ही पदे रिक्त का ठेवली. माहिती दयावी

श्री.गिरजाराम हळनोर :एक कार्य.अभियंता पदा मागे किती उपअभियंता ,क.अभियंता ,दुय्यम अवेक्षक असावे नॉमस् ठरलेले आहे त्याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी पदे भरताना त्यांचे अंतर्गत किती पदे असायला पाहिजे याचे नॉमस् आहेत का ?

श्री.संजय केनेकर :जी पदे भरलेली आहे ती बिंदू नामावलीनुसार आहेत का जर तसे असेल तर संबधीतांना स्टे का मिळाला खुलासा करावा.

अस्थापना अधि.-१ :स्टे मिळालेला नाही ७ पदाची जाहिरात दिली आहे ३१ मार्च २०११ रोजी बिंदू नामावली तपासली आहे योग्य आरक्षण केले आहे.

श्री.संजय केनेकर :अगोदर भरलेली पदा बाबत बोलतो आहे

श्री.काशिनाथ कोकाटे :एका संवर्गातील पद दुस-या संवर्गात दिली का ?

अस्थापना अधिकारी-१ :नाही तसे नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :त्यांची नावे सांगावी नियमावली मागवावी.

श्री.संजय केनेकर :७ पदाची जाहिरात दिली त्या बाबत काय प्रोसेस चालू आहे.

अस्थापना अधि-१ :अर्जाची स्कूटनी चालू आहे.

श्री.संजय केनेकर :ही भरावी असे मा.आयुक्तांनी सांगितलेले आहेत का ?

अस्थापना अधिकारी-१ :अर्ज आलेले आहे त्यांची स्कूटनी करतो आहे.

श्री.संजय केनेकर :ही पदे भरण्याचे स्थगित ठेवावे म्हणून सांगितलेले आहे.

अस्थापना अधिकारी-१ :असे काही सांगितलेले नाही.

श्री.संजय केनेकर :सभागृहाची दिशाभूल होते १२४ पदा बरोबर या ७ पदाचा विषय आहे.मा.आयुक्त यांनी माझ्या व मा.महापौर यांचे समक्ष सांगितले की ही पदे भरण्याचे स्थगित ठेवावे तरी ही संबधीत अधिकारी नाही म्हणता स्कूटनीचे काम थांबलेले आहे स्कूटनी चालू नाही.

अस्थापना अधिाकारी-१ :स्कूटनीचे काम चालू आहे.

श्री.संजय केनेकर :मा.आयुक्तांनी ही स्कूटनी थांबविली होती. पदे भरतांना लेखा विभागाचा आर्थिक परीस्थती बाबत अहवाल घेतला का मा.आयुक्तांनी सांगितले जाहिरात काढा तर काढली जाते का,आर्थीक परीस्थितीचा विचार होत नाही का ?

अस्थापना अधि.-१ :अस्थापनेवर ती पदे मंजूर आहे.

श्री.संजय केनेकर :केंव्हा पासून रिक्त आहे.

अस्थापना अधिकारी-१ :केंव्हापासून रिक्त आहे लेखी आहे.

श्री.संजय केनेकर :यापुर्वीच का भरली नाही

अस्थापना अधिकारी-१ :शासनाकडून पदे भरावी असे होते त्या नुसार जाहिरात दिली.तातडीने पदे भरा म्हणून आहे.

श्री.अफसर खान :कुणाला तरी ३ वर्ष होत आहे ३-४ महिणे राहिले म्हणून ही पदे भरली जात आहे का ?

मा.उपमहापौर : मध्यतंरी जाहिरात आली स पदाधिकारी व जेष्ट स.सदस्य आमची बैठक झाली,अनेक कर्मचारी महापालिकेत दै.वेतनावर काम करीत आहे.काही कर्मचारी वयोमानाने ३-४ वर्षा निवृत्त होतील चर्चा झाली या कर्मचा-यांना न्याय मिळणार की नाही.जसा हा प्रस्ताव आला त्यानुसार आजही एक कवडे नावाचे कर्मचारी १०-१२ वर्षापासून आपल्याकडे अस्थायी म्हणून काम करतात.त्यांना न्याय मिळणार नाही जे पदे मंजूर आहे त्यात त्यांना प्राधान्य दिले जाणार नाही दैनिक वेतनावर कर्मचारी निवृत्त होत आहे त्यांना कोणत्याही सवलती मिळत नाही. दै.वेतावरील यांना कायम दै.वेतनावर ठेवायचे व नवीन पदे भरायची जी जाहीरात होती त्यापदाचे ५० टक्के कर्मचारी आजही दै.वेतनावर आहे.त्यांना यात

समावेश करता येईल का असे अधिका-यांना सांगितले ,६ लिपीक पदाची जाहिरात दिली महापालिकेकडे ४ लिपीक आहे त्यात त्यांना कोणत्याही फायदे मिळत नाही.ही वस्तुस्थिती जेंव्हा मा.आयुक्ताच्या समोर मांडली तेंव्हा मा.आयुक्तांनी म्हटले होते की यास लगेच स्थगिती दयावी.श्री.चारठाणकर यांना मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रात बैठक चालू असतांना लगेच या भरतीला स्थगिती दयावी म्हणून सांगितले होते.आता वैद्यकीय अधिकारी पदे भरण्याचा विषय आहे मागिल बॉडीच्या वेळेस आरसीएच प्रकल्पा अंतर्गत असलेल्या कर्मचा-यांना महापालिकेत सेवेत सामवून घेतले तो प्रकल्प शासनाचा होता येथील कर्मचा-यांना घेतले नाही शासनाचा प्रोगाम आहे त्या लोकांना आमची दिशाभूल करू घेतले गेले शासनाने मंजूरी दिली म्हणून बोललो नाही आता आरसीएच फेस-२ हा प्रकल्प पेंडींग आहे. ती पदे भरण्यास मा.आयुक्त सांगतात स्थगिती दयावी येथे प्रस्ताव देवून वाढीव पदास शासनाकडून मंजूरी घ्यायची आणि आरसीएच फेस-२ च्या कर्मचा-याची भरती करायची असे दिसते..जी जाहिरात दिलेल्या पदामध्ये ५० टक्के दै.वेतन कर्मचारी पात्र होवू शकतात. याचा अहवाल सर्वसाधारण सभेत सादर करावा त्यानुंसार निर्णय घेता येईल आताच म्हटले अर्जाची स्कूटनी चालू आहे लोकांमध्ये गैरसमज होवू नये पुर्ण अहवाल सभागृहासमोर आणावा १२४ पदाची जाहिरात काढली त्यातील उदा ५० कर्मचारी दै.वेतनाचे पात्र ठरवू शकतात उर्वरीत पदासाठी ती जाहिरात असावी ही सर्वांची भुमिका होती मा.आयुक्तांनी या भरतीला स्थगिती दिली होती. संबधीत अधिकारी सांगतात स्थगिती नाही मा.आयुक्तांनी श्री. चारठाणकर साहेब यांना या बाबत फोन केला होता की नाही खुलासा करावा.

उपआयुक्त (म) :विषय क्र. ४५७ च्या अनुषंगाने जी चर्चा चालू आहे स.सदस्य श्री संजय केनेकर स.सदस्य श्री काशिनाथ कोकाटे यांनी जो मुद्दा उपस्थित केला अस्थापनेवर जे ३ अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी पदाच्या पदनिर्मितीच्या अनुषंगाने अस्थापना विभागा मार्फत हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे याचेशीच निगडीत एक बाब म्हणजे मागे जी १२४ पदाच्या संदर्भात जाहिरात केली होती ती दिल्यानंतर आताच जे मा.उपमहापौर युनी नमुद केल्याप्रमाणे जे अस्थापनेवर दै.वेतनावर काम करणारे कर्मचारी आहेत त्यांचेवर यामूळे अन्याय होतो आहे व १२४ पदे बाहेरून भरता आहेत वास्तविक पाहता त्यामध्ये आपण वयाची अट शिथील करण्याचे नमूद केले होते तरी सभागृहाच्या ज्या भावना होत्या त्या लक्षात घेवून त्यावेळेला मा.आयुक्तांनी या भरती प्रक्रियेला स्थगिती देण्याचे सुचीत केले होते आणि त्याप्रमाणे माझीही अशी धारणा आहे की भरती प्रक्रियेला मा.आयुक्तांची स्थगिती आहे.

श्री.संजय केनेकर : उपआयुक्त श्री.चारठाणकर हे आज आयुक्त म्हणून बसलेले आहे यास स्थगिती दिली होती एक जबाबदार अधिकारी सभागृहाची

दिशाभूल केली जाते एक तर मा.आयुक्त खोटे असेल नसता आपण खोटे असाल.

अस्थापना अधिकारी-१ :या पदांना स्थगिती दिली हे मला माहित नाही अर्जाची स्कुटनीचे काम चालू आहे.

श्री.त्रिंबक तुपे :जे अधिकारी बोलतात ते कुणाला मान्य नाही.मा.आयुक्त सांगतात या पदाना स्थगिती दिली होती पदाधिकारी तेथे होते सदस्य होते जबाबदार अधिकारी सांगतात की मला माहित नाही संबधीत अधिकारी हे मा.आयुक्तांच्या निर्णयाला क्रॉस करून बोलत आहे.

अस्थापना अधिकारी-१ :या विषयाबाबत मला बोललेले नाही किंवा थांबवा म्हणून सांगितलेले नाही.स्कुटनीचे काम चालू आहे ते थांबवू शकलो असतो मला माहित नाही लेखी दिले नाही.

श्री.मीर हिदायत अली :मा.आयुक्तानी संबधीत अधिकारी यांना छाननी (स्कुटनी) थांबवा म्हणून लेखी आदेश दिले का?

श्री.अफसर खॅान :मा.आयुक्तांनी त्यांना लेखी दिले नाही संबधीत अधिकारी यांची चुकी नाही मा.आयुक्तांना माहित असेल स्थगिती आहे की नाही.

श्री.नासेर खॅान :अधिका-यांना टारगेट करण्याचा प्रयत्न आहे त्यांना लेखी दिले का?

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.त्रिंबक तुपे :यानंतर अधिका-यांना मा.आयुक्तांनी लेखी दयावे तर अधिकारी काम करतीत अशी भुमिका दिसते.

श्री.संजय केनेकर :सभागृहात खोटे बोलू नये अशी विनंती आहे. मा.आयुक्तांची स्थगिती आहे हे संबधीत अधिकारी यांना सांगितले होते की नाही.

अस्थापना अधिकारी-१ :मा.आयुक्तांच्या चर्चेमध्ये आपल्या सर्वांच्या समक्ष चर्चा झाली होती १५ दिवसा पुर्वीचा विषय आहे तेंव्हा सांगितले होते की या संदर्भात मला माहित नाही

श्री.संजय केनेकर :माहित नव्हते तर आपण समक्ष होता मा.आयुक्तांना विचारण्याचे संबधीत अधिका-याचे काम होते.

या वेळी अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.मिलींद दाभाडे :एका अधिका-याला जबाबदार धरण्यासाठी पदाधिका-यांनी घेतलेला हा निर्णय दिसतो.

श्री.संजय केनेकर :स.पदाधिका-याचा निर्णय नाही १२४ पदाच्या बाबतीतला निर्णय आहे.२०-२० वर्षापासून दैनिक वेतनावर कर्मचारी काम करतात त्यांचा विचार व्हावा मा.न्यायालयाकडून कोणत्या पदासाठी स्थगिती मिळाली आहे ते सांगावे

मा.महापौर :आस्थापनेचा सविस्तर अहवाल आल्या शिवाय तसेच मा.आयुक्त येईपर्यत हा विषय स्थगित ठेवत आहोत.दैनिक वेतनावरील कर्मचारी कायम करावे असे वेळोवेळी प्रशासनाला आदेशीत केले आहे. प्रशासनाने यात दिरंगाई केलेली आहे. त्यामूळे हा विषय स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी संवर्गाची वाढीव ०३ पदे मंजूर करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत आस्थापनेचा सविस्तर अहवाल येईपर्यंत तसेच दैनिक वेतनावरील कर्मचारी कायम करण्यास वेळोवेळी प्रशासनाला आदेशीत केले. प्रशासनाने दिरंगाई केल्याने प्रस्तावास तुर्त स्थगिती देण्यात येते.

**चर्चा :**

श्री.संजय केनेकर :प्रशासनाकडून माहिती मिळत नाही परंतु १२४ कर्मचारी भरतीतील एका पदास मा. न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

श्री.त्रिंबक तुपे :हा विषयावर मा.महापौरांनी रूलींग दिले आहे

श्री.काशिनाथ कोकाटे :२६८ दै.वेतनावर कर्मचारी यांना शासनाच्या २०१० च्या जी आर नुसार रू.३६५ दै.वेतन दयायला पाहिजे. सभागृहाने तसा निर्णय घेतला ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनात वाढ झाली दै वेतन कर्मचारी यांचे वेतनात वाढ का होत नाही.

श्री.संजय केनेकर :जी आर नुसार वाढ करावी निर्णय घेतला प्रशासनाने आजपर्यत का कार्यवाही केली नाही लेखा विभागाकडून माहिती घ्यावी.

मुख्यलेखाधिकारी :दैनिक वेतन वाढ बाबतची संचिका तयार आहे चर्चा करावी असे दिले चर्चा केली आर्थीक परीस्थितीमूळे संचिकेवर कार्यवाही झाली नाही

श्री.संजय केनेकर : नवीन भरतीला नाही दै. वेतनात वाढ करण्यासाठी आर्थीक परीस्थितीचे कारण दाखविणे बरोबर नाही नवीन भरती करण्यासाठी लेखा विभागाचा अहवाल घेतला का.

श्री.अफसरखॉन :एकीकडे नवीन भरती करत आहोत. दै. वेतन वाढविण्यास पैसे नसल्याचे सांगितले जाते एक वर्षात माझ्या माहिती प्रमाणे १२४ चेक वटवले नाही खुलासा घ्यावा

श्री.संजय केनेकर :मागिल एक वर्षापासून दैनिक वेतनात वाढ करायला पाहिजे होती फरकाची मागणी केली नाही दै.वेतन लागू करावा एवढीच मागणी केली आर्थीक परीस्थितीचे कारण दाखविले जाते नवीन भरती कशी होत आहे.

मा.महापौर :किती चेक बॉउन्स झाले खुलासा करावा.

श्री.संजय केनेकर :आरसीएच फेस-२ जे करारपध्दतीने लोक घेतले त्याचे वेतन वाढविण्याचा विचार आहे त्यासाठी चर्चा करावी असे म्हटले असेल दैनिक वेतन वाढ करण्या बाबत आदेशीत करावे.आजच्या आज कार्यवाही व्हावी.

श्री.मिलींद दाभाडे :किती रक्कमेचे चेक बॉउन्स झाले

मुख्यलेखाधिकारी :तुर्त माहिती माझेकडे नाही

श्री.खाजा शरफोद्दीन :पैसे नव्हते तर धनादेश का दिले.

मुख्यलेखाधिकारी :मा.आयुक्ताशी चर्चा करून दै.वेतनात वाढ करण्यात येईल.

श्री.मीर हिदायत अली :शिक्षण विभागाचे शासनाकडून सन २००९,२०१० या वषाचे ६०,६० लक्ष निधी आला जीपीएफ मध्ये जमा करण्याचे म्हटले जमा झाले की नाही खुलासा घ्यावा.

मुख्यलेखाधिकारी :६ व्या वेतन आयोगानुसार शिक्षण विभागाचे फरकाची रक्कम शासनाकडून दोन आदेशान्वये प्राप्त झाली १ कोटी अकांऊटला जमा आहे मा.आयुक्ताचे २-३ दिवसापूर्वी ते रक्कम जमा करण्याचे आदेशही झाले आहे २-३ दिवसात त्या अकांऊटला ती रक्कम जमा होईल

श्री.मीर हिदायत अली :रक्कम अदयाप का जमा झालेले नाही.

श्री.मिलींद दाभाडे :अकाऊटमध्ये पैसे नसतांना धनादेश देता येतात का, मा. न्यायधीश यांचे पगाराचे धनादेश सुध्दा बॉउन्स झाले ठराविक ठेकेदारास धनादेश दिले जातात ते बाऊन्स होत नाही या प्रकरणी कोण दोषी कोणावर कार्यवाही होणार आहे.चेक बाऊन्स गुन्हा कोणावर होतो.

मा.महापौर :अकांऊटमध्ये पैसे नसतात तेंव्हा संबधीत अधिकारी सांगतात परंतु स.सदस्याच्या मागणीनुसार त्यांचे समाधानासाठी चेक देण्यात येतात ते बॉउन्स होतात.

श्री.प्रमोद राठोड :पैसे नसतांना चेक देणे चुकीचा पायंडा पडत आहे. पैसे नसतांना चेक दयावे असे कुणीही म्हणणार नाही .

श्री.सुशिल खेडकर :या बाबतीत नियमानुसार जे कुणी असेल त्यांचेवर कार्यवाही होईल दुसरा विषय घ्यावा.

यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात

श्री.मिलींद दाभाडे :चेक दयावे कुणी शिफारस केली होती पैसे नसतांना चेक देवू शकतो का ?

मुख्यलेखाधिकारी :चेक देतांना कॅशबुक बघीतले जाते काही वेळेस पैसा येणारा असतो त्यामूळे चेक दिला जातो.

श्री.त्रिंबक तुपे :काम करत असतांना दुसरी बाजू आपण सर्व सदस्यांनी सांभाळून घेतली पाहिजे दुसरा विषय घ्यावा.

श्री.अफसर खॉन :किती व कुणाचे चेक बॉउन्स झाले माहिती दयावी.

मा.महापौर :यानंतर अशा प्रकारची चुक होणार नाही याची दखल घ्यावी दैनिक वेतनावरील कर्मचारी यांना शासन जी.आर नुसार दैनिक वेतन देण्यात यावे

श्री.मीर हिदायत अली :शिक्षण विभागाचे सन २००९,२०१० या दोन वर्षाचे १.२० कोटी रक्कम शासनाकडून प्राप्त झाली जीपीएफ मध्ये जमा करावे असे डायरेक्शन दिले शिक्षकाच्या खात्यावर जमा करावे

मा.महापौर :याबाबत लेखी माहिती स.सदस्य यांना दयावी.

**विषय क्र. ४५८** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८६ प्रियदर्शनी इंदिरा नगर येथील कब्रस्तानालगत असलेले सार्वजनिक शौचालय सध्या संपुर्णपणे तुटलेले आहे व सद्यस्थितीत सदर शौचालय, नागरीकांच्या अपयोगात नाही. त्यामुळे येथील स्थानिक रहिवाश्यानी सदर शौचालय तोडणे बाबत मागणी केली आहे.

तरी वार्ड क्र.८६ प्रियदर्शनी इंदिरा नगर येथील कब्रस्तानालगत असलेले सार्वजनिक शौचालय तोडणे (निक्सासित) करणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव.:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८६ प्रियदर्शनी, इंदिरा नगर येथील कब्रस्तानालगत असलेले सार्वजनिक शौचालय तोडणेस (निक्सासित) करणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र. ४५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहानुरवाडी येथील बी.ओ.टी. तत्वावर विकसीत केलेली भाजी मार्केटची जागा स.न. १२, आरक्षण क्रमांक २६२ ही जागा बी.ओ.टी. तत्वावर तीस कालावधीसाठी भाडे तत्वावर देणे करीता बी.ओ.टी समितीच्या दिनांक १५.०९.२०१० रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार निविदा कार्यवाहीसाठी चौथ्या वेळेस दिनांक १८.०१.२०११ रोजी (चौथी वेळ) निविदा प्रकाशीत करण्यात आली. सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने विकसीत केलेल्या जागेवर किमान एक हजार तात्पुरत्या स्वरुपाचे गाळे उभारुन आठवडयाच्या दर सोमवारी भाजी मार्केट भरविणे व आठवडयातील इतर सहा दिवशी सदर जागा अनुज्ञेय वापरासाठी ३० वर्षाच्या भाडेतत्वावर देणेकरीता प्रस्ताव असुन निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक ०९.०२.२०११ पावेतो एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) राजेश के. भारुका, औरंगाबाद

२) मे.पृथ्वी इंटरप्रायजेस ॲन्ड जे.व्ही. औरंगाबाद

वरील दोन्ही निविदा धारकांनी पात्रता निकष पुर्ण केलेले असल्याने देकार दर उघडण्यात आले त्यांचे दर खाली नमुद प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | वार्षिक दर भाडे | प्रिमियम रक्कम |
|---|---|---|---|
| १ | राजेश के. भारुका, औरंगाबाद | रुपये ४,१२,०००/- | रुपये ११,००,०००/- |
| २ | मे.पृथ्वी इंटरप्रायजेस ॲन्ड जे.व्ही. औरंगाबाद | रुपये २६,९९,९९९/- | रुपये २१,००,०००/- |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त देकारापैकी मे.पृथ्वी इंटरप्रायजेस ॲन्ड जे.व्ही. औरंगाबाद यांचे दर तुलनात्मक दृष्टया उच्चतम प्राप्त आहे. सदर देकार दर महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.पृथ्वी इंटरप्रायजेस ॲन्ड जे.व्ही. यांचे वार्षिक दर भाडे रुपये २६,९९,९९९/- प्रति वर्ष आणि प्रिमियम रक्कम रुपये २१,००,०००/- या दराने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

**संवाद:-**

श्री.सुशिल खेडकर :यापुर्वीच्या सभेत या बाजारा विषयी स.सदस्य श्री. वैद्य व मी प्रश्न उपस्थित केला पुर्वी हा पीरबाजार येथे रस्त्यावर भरायचा तेथे रस्त्यावर भरण्यात येवू नये मा.न्यायालयाचे आदेश होते त्यानंतर हा बाजार स.सदस्य श्री. वैद्य याच्या व माझ्या वार्डात ५०-५० टक्के आजही रस्त्यावर भरतो वेळोवेळी मागणी केल्यानुसार ही निविदा मागविली जर स.सदस्यांनी मागणी केल्यानुसार नंतर घाईघाईने निविदा मागवून

महापालिकेचे नुकसान करू इच्छित असेल तर योग्य नाही ही निविदा तात्काळ रद्य करावी व फेर निविदा मागवावी.

श्री.राजू शिंदे : २७ लक्ष निविदेत आले ते बेसीक अमांऊट राहील त्यापेक्षा जास्त येईल देश पातळीवर निविदा काढावी ही निविदा रिकॉल करावे सभागृहाची भावना आहे.

श्री.संजय जोशी :प्रस्तावात दिं.१५-९-२०१० रोजी बीओटी कमेटीची बैठक झाली व दिनांक १८-१-२०११ रोजी चौथ्यांदा हे टेंडर आले असे यात दिले

या वेळी एकाचवेळी अनेक स.सदस्य बोलत असतात.

श्री.राजू शिंदे :तीन वेळेस रिकॉल झाले ते ३ वर्षासाठी होते पहिल्यांदा रिकॉल झाले ते ३० वर्षासाठी.

श्री.संजय जोशी :यात चार वेळेस दिले चार वेळेस रिकॉल झालेले नाही.

श्री.अफसर खॉन :यापूर्वी रेल्वेस्टेशन ,जालना रोड बीओटीवर काम दिले ते पुर्ण झाले नाही असे असतांना हे का आणले.बीओटी वर काम होत नाही रद्य करावे. करोडोची जागा अल्प किमतीत दिली जाते हे योग्य नाही

श्री.राजू शिंदे :जास्त वेळ न घेता यास रिकॉल करावे.

श्री.संजय जोशी :रिकॉल करावे सहमत आहे. बीओटीचा अनुभव असणा-यांना ही निविदा दयावी ही अट टाकली याचा अर्थ आधीपासून हे टेंडर कुठल्यातरी एका व्यक्तीला दयायचे होते ४ वेळेस रिकॉल झाले नाही या संबधीची बैठक १० व्या महिण्यात झाली दोन महिण्यानंतर टेंडर काढले तर दोन महिण्यात चार वेळा कसे रिकॉल होवू शकते १५-९-२०१० रोजी बीओटीची बैठक झाली त्यात ७ वर्षा ऐवजी ३० वर्ष केले

याच वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अफसर खॉन :बीओटी सेल रद्य करावे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे

श्री.गिरजाराम हळनोर :रिकॉल करावे येथे हॉकर झोन मध्ये जागा ठेवण्याची दुरूस्ती करावी.

श्री.संजय केनेकर :प्रशासनाचा गलथान कारभार स.सदस्य निदर्शनास आणून देत आहे ऐकूण घ्यावे.

श्री.त्रिंबक तुपे :या विषयामध्ये सर्वांचाच विरोध आहे चार वेळेस निविदा आली असे दिले परंतु ती निविदा ३ वर्षासाठीची होती निविदा होत असतांना ती देशपातळीवर व्हावी फेर निविदा काढावी जागा बिल्डरांच्या घशात देतो अशी भावना व्हायला नको फेर निविदा काढावी जास्तीत जास्त फायदा होईल हे बघावे.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात

मा.महापौर :सदरील निविदेमध्ये प्रस्तावित भाडे तत्तावर देण्यात येणा-या जागेचे एकूण क्षेत्र जवळपास १ लाख चौरस फुट एवढें आहे आणि सदरील जागा ही मुख्य बाजार पेठेतील आहे त्यामूळे ती महागडी आहे भाडे तत्तवावर देण्यात येणा-या जागेचा करार हा ३० वर्षासाठी प्रस्तावीत आहे परंतु तो फक्त ३ वर्षासाठी होता त्यामुळे निविदेला प्रतिसाद

मिळत नव्हता आता ३० वर्षासाठीचा जो प्रस्ताव असल्याने भविष्यात यास प्रतिसाद मिळण्याची शक्यता प्रस्तावित जास्त रक्कमेपेक्षा जास्त भाडे व प्रिमीयम मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही सदरील प्रस्तावामध्ये सर्वे नं. १२ शहानुरवाडी येथील बीओटी तत्तवावरती जो तात्पुरत्या स्वरूपाचा गाळा बांधण्या साठी निविदा काढून वार्षिक भाडे मे पृथ्वी इंटरप्रायजेस ॲन्ड जे व्ही औरंगाबाद यांनी जवळपास २७ लक्ष अशी जी निविदा भरली आहे रूपये २१ लक्ष असा प्रिमीयम सुध्दा भरला आहे तो कमी वाटतो असे सभागृहाचे मत आहे भविष्यात सदरील प्रस्तावातील सर्वे क्र. १२ शहानुरवाडी भाजी मार्केटची जागा बीओटी तत्तवावर भाडेपट्टेने दयावयाची झाल्यास देश पातळीवर वृत्तपत्रात निविदा प्रस्तावित करण्यात यावी व सदरील जागेची त्याची वार्षीक भाडेची रक्कम प्रिमीयमची रक्कम यासाठी मोठया प्रमाणात स्पर्धा होवून प्रस्तावित रक्कमेपेक्षा जास्त आली तरच या ते या सभागृहासमोर विचारार्थ ठेवावी प्रस्तावातील भाडे रक्कम व प्रिमीयम रक्कम ही किमान रक्कम म्हणून ग्राहय धरावी त्यापेक्षा कमी भाडेपट्टेवर सदर जागा कोणासही देवू नये सदरील जागेवर अंतिम निर्णय होईपर्यत त्या जागेवर सोमवारचा आठवडी बाजार भरविण्यात यावा.

श्री.राजू शिंदे :यात दुरूस्ती ही करावी की हे काम महापालिकेकडून झाले तर करावे नसता बीओटीवर करावे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत होते.

श्री.संजय जोशी :हा युरोपीयन बाजार म्हणून येथे भरणार होता.

श्री.राजू शिंदे :या विषयावर रूलींग झालेले आहे आता पुढचा विषय घ्यावा

श्री.संजय केनेकर :७५ टक्के स.सदस्यांना हा प्रस्ताव कसा व कशासाठी आला हे समजलेले नाही.

मा.महापौर :पुढील सभेत सविस्तर अहवाल या संदर्भात सादर करावा

श्री.संजय केनेकर :यात जे दोषी आहे त्यांचे पितळ उघडे पाडण्यासाठी स.सदस्य बोलू इच्छित आहे.

श्री.राजू शिंदे :तो प्रश्न नाही यात महापालिकेचा या निर्णयामुळे फायदा होणार आहे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :स सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.राजू शिंदे :रूलींग समाधानकारक आहे यास रिकॉल करण्यात यावे.

श्री.संजय केनेकर :आपल्या निर्णयाचे स्वागत करतो सर्वाचे म्हणणे रद्य करावे यास आमचा विरोध नाही दोषी अधिकारी कोण आहे हे स.सदस्यांचे ऐकूण घ्यावे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.राजू शिंदे :आपल्या निर्णयाचा आदर करतो ४६० विषय घेण्यात यावा.यात महापालिकेचे हित लक्षात घेवून येथे युरोपियन मार्केट व्हावे अशी महापालिकेची भावना आहे

मा.महापौर :सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते (वेळ २.२० वाजता पुन्हा सभा ३.०० वा सुरू)

श्री.संजय जोशी :याची मुळ संकल्पना तेथे युरोपीयन मार्केट होण्याची होती आठवडयातून एक दिवस भाजी बाजार भरणार त्या भाजी बाजारमध्ये १००० गाळे असतील जे की सोमवार नंतर ते काढून ठेवता येतील आणि एका ते साईडचे असतील असा हा बाजार होता या ठिकाणी भाजीच्या भावाचे बोर्ड लागतील उर्वरीत ६ दिवस या ठिकाणी विविध प्रकारचा बाजार भरेल असे त्यावेळी ठरले होते लग्न किंवा इतर कार्यक्रमासाठी हे ग्राऊड दिले जाणार नाही असा स्पष्ट उल्लेख त्यात होता असे सर्व असतांना प्रशासनाने सभागृहाची धुळफेक करून इथे एक वेगळेच टेंडर सादर केले जी मुळ संकल्पना होती त्यास फाटा देवून हे एक वेगळेच प्रस्ताव आणलेला आहे श्री.गुप्ता साहेब आयुक्त असतांना बीओटी सेलच्या सोबत बैठक होवून जी संकल्पना होती तीच संकल्पना येथे राबविल्या जावी टेंडर मध्ये जे प्राब्लेम झाले आहे त्यामूळे हे रद्य करावे व नव्याने जो आपला जसा कन्सेप्ट ठरला होता त्याप्रमाणे टेंडर काढण्यात यावे.

मा.महापौर :विषय क्र. ४५९ मध्ये मा.आयुक्तांनी ज्या त्रृटी ठेवल्या होत्या त्या पुर्ननिवेदेमध्ये आढळल्या नाही पाहिजे.असे आदेशीत करण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील निविदेमध्ये प्रस्तावित भाडे तत्वावर देण्यात येणारी जागा ही मुख्य बाजार पेठेतील असल्याने महाग आहे प्रस्तावित रक्कमेपेक्षा जास्त भाडे व प्रिमीयम मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही सदरील प्रस्तावात नमुद निविदा धारकांनी भरलेले वार्षिक भाडयाचे दर व प्रिमीयमची रक्कम कमी वाटते सबब सदर निविदेत तृटया न ठेवता देश पातळीवरील वृत्तपत्रात पुन्हः प्रसिध्दी देण्यास मंजूरी देण्यात येते तसेच सदर निविदेत जास्त दर आलेले वार्षिक भाडयाची रक्कम रू २६,९९,९९९/- व प्रीमीयम रू.२१,००,०००/-हे निविदेची किमान आधारभूत रक्कम ग्राहय धरण्यास व या निविदेपेक्षा जास्त दराची भाडे व प्रीमीअम रक्कमेची निविदा आल्यास अशी निविदा सभागृहापुढे सादर करण्यास मंजूरी देण्यात येते तसेच अंतिम निर्णय होईपर्यत सदर जागेवर सोमवारचा आठवडी बाजार भरविण्यास व या संबधीचा सविस्तर अहवाल पुढील सभेत ठेवण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र सरकारच्या आवास व शहरी उपशमन मंत्रालय मार्फत जेएनएनयुआरएम योजनेच्या ७ कलमी कार्यक्रम अंतर्गत शहरातील घोषित व अघोषित झोपडपट्टी मधिल शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविने व सन २०२० पर्यंत झोपडपटटी मुक्त शहर निर्मीती बनविण्याचे शासनाचे धोरण असल्याने राजीव आवास योजना या नावाने योजना केंद्र सरकारने योजना हाती घेतलेली आहे.

वरील योजने अंतर्गत महानगरपालिकेचा समावेश होणे, वेळोवेळी केंद्र शासनाकडुन तसेच राज्य शासन व नियुक्त नोडल एजन्सी यांचे मार्फत प्राप्त होणारे निर्णय / परीपत्रकानुसारची कार्यवाही करणे, सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी खाजगी एजन्सी नियुक्त करणे, योजनेच्या मार्गदर्शनानुसारची सविस्तर कार्यवाही करणे, शासनास प्रस्ताव पाठविणे, विशेष तांत्रिक कक्ष स्थापन करणे, शहरातील एका प्रभागात प्रायोगीक तत्वावर पथदर्शी प्रकल्प राबविने, इत्यादि बाबतची कार्यवाही करणे बाबत आयुक्त महानगरपालिका, यांना अधिकार प्रदान करणे बाबतच्या सविस्तर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.३९५ दिनांक १९.७.२०११ नुसार मान्यता प्रदान केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका हददीतील एकुण ५३ घोषित झोपडपट्टी आणि ११७ अनधिकृत वसाहतींचे सर्वेक्षणाचे काम खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे.

१. शहरातील स्लम भागातील जमीनीचे व इमारतीचे सर्वेक्षण करणे (Slum surveys land related capacity building activates in city for slumm\MIS.)

२. स्लम एम.आय.एस. सिस्टीमचे संगणकीकरण करणे (Development of web enabled slum MIS system.)

३. शहरातीच्या विकासा संबधी नकाशे व जी.आय.एस. चा वापर करुन स्लम भागाचे नकाशे तयार करणे. (Development of city base map & slum Maps using GIS with Carat Sat/carat sat images.)

४. स्लम भागाचा पुर्नविकास / पुर्नवसन नकाशे, झोनल नकाशे, व झोपडपट्टी मुक्त बाबतचा कृती आराखडा तयार करणे. (Preoaration of slum Redevelopment/Rehabilitation plans Zonal plans and city level slun free plans of action)

५. नॅशनल टेक्नीकल इन्स्टीटयुट व नॅशनल नेटवर्क ऑफ रिसोर्स सेंटर सोबत एम.आय.एस./ जी.आय.एस. स्लम भागाचे नकाशे, स्लम भागाचा विकास तसेच झोपडपट्टी मुक्त शहर व झोपडपट्टी मुक्त राज्य करणेसाठी कृती आराखडा तयार करणे व त्यासाठी लागणारा सविस्तर खर्च तसेच अतिरिक्त प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे. (Detail cost of any additional training programmer required in relation to slum MIS/GIS slum mapping slum development / slum free city and slum free state planning project management proper reforms etc. with the incolvement of national technical institutions and national network of resource centers.)

६. प्रशासकीय व कार्यालयीन खर्च, तांत्रिक कक्ष व त्यासाठी लागणारे कर्मचारी वर्गासाठी शहरासाठी नमुद कामाकरीता लागणारा खर्च (सदर खर्च हा अ.प. रक्कमेच्या 5% पेक्षा जास्त नसावा) (Administrative & office expenditure including establishment of technical cell with staff at city level for actuating and guiding all the above activities (not exceeding cumulative of 5% of above costs) बाबतचे सर्वेक्षण करण्यासाठी रक्कम रुपये ७,४८,९७,०००/- चे सविस्तर अंदाजपत्रक (format) तयार करण्यात आलेले होते व या बाबतचा सविस्तर अहवाल शासनास जा.क्र/मनपा/स्लम/२०१०/१५८ दिनांक ३१.३.२०१० अन्वये सादर करण्यात येवुन सर्वेक्षणाच्या कामासाठी वरील आर्थिक तरतुद उपलब्ध करुन देणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

परंतु औरंगाबाद गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ औरंगाबाद या विभागाकडुन वित्त नियंत्रण प्राधिकरण मुंबई यांचे कडुन औरंगाबाद महानगरपालिकेस राजीव योजना सन २०१०-२०११ करीता रक्कम रुपये १.३६ कोटीचाच निधी जा.क्रं/मुअ/औमं/निव्य/टोकन क्र/१११३/२०११ दिनांक १४.३.२०११ अन्वये प्राप्त झालेला आहे.

राजीव आवास योजना प्रभावीपणे व विहीत कालावधीत पुर्ण होण्याच्या दृष्टीकोनातुन शासनाकडुन प्राप्त निधी मधुन मनपा हददीतील एकुण ५३ घोषित झोपडपट्टी आणि १७ अनधिकृत वसाहतीतुन १ लक्ष घरांचे पहिल्या टप्प्यातील (१) सोशीओ एकनॉमीक सर्वे (Socio-Economic Survey) (२) बायोमॅट्रीक सर्वे (Bio-Metric Survey) (३) शहर हद्दीतील तांत्रिक कक्षासाठी स्लम भागाचे सर्वेक्षण करुन माहिती संकलित करणे व वेब इनॅबल सिटी लेवल डाटा बेस व डाटा लाईन रिपोर्ट तयार करणे. (Entry of data from slum Survey to generate web-enable city level database and baseline reports for city level technical cell) या संदर्भाने सर्वेक्षण करण्यासाठी रक्कम रुपये ७०,००,०००/- ची फेर निविदा मनपा/जा.क्रं./ई निविदा/०६/२०१० दिनांक १७.५.२०१० अन्वये विहीत अटी व शर्ती नुसार ई निविदा मार्फत मागविण्यात आल्या असता तसेच निविदा विक्री दिनांक १८.५.२०१० ते ०५.०६.२०१० पर्यंत एकुण तीन (३) निविदा विक्री झाल्या तसेच निविदा स्विकृती दिनांक १८.५.२०१० ते ०५.६.२०१० पर्यंत एकुण दोन (२) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सदरील निविदा दिनांक २२.३.२०११ रोजी ई निविदाद्वारे उघडण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले आहे.

१. मे.सीमा कंन्सलटंट - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९ % कमी दराने.
२. मे.इन्फ्रास्ट्रक्चर कंन्सलटंट - संबंधित एजन्सीने इसारा रक्कमेचा धनाकर्ष ई निविदा विभागात जमा न केल्याने निविदा नाकारण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे मे.सीमा कंन्सलटंट यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९ % कमी दराचे निविदा दर प्राप्त झालेले आहेत.

करीता मनपा हददीतील एकुण ५३ घोषित झोपडपट्टी आणि ११७ अनधिकृत वसाहतीचे सविस्तर सर्वेक्षण करण्यासाठी मे.सीमा कंन्सलटंट यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९% कमी दराचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

<u>संवाद:-</u>

श्री.प्रमोद राठोड :या बाबतीत खुलासा घ्यावा.

कार्य.अभियंता(बीओटी) : राजीव आवास योजने नुसार सर्वे करण्याचे बाबत विषय आहे.रू ७.४८ कोटीमध्ये औरंगाबाद शहराचा सर्वे करायचा त्यासाठी १.३६ कोटी प्राप्त आहे जे टेंडर कॉल केले त्यात सोशीओ एकनॉमीक, बायोमॅट्रीक हे दोन्ही सर्वे शहरातील अनधिकृत , अधिकृत व स्लम भागात सर्वे करणार आहोत त्यासाठीची निविदा आहे.घरोघरी जाउन सर्वे करणार सोशीओ सर्वेमधे ते कुटूंब दारिद्रय रेषेखालील व कुटूंब किती घराचे क्षेत्रफळ किती,आहे २५ स्क्वे.मी. क्षेत्र मिळते का हा सर्वे करणार नंतर बायोमॅट्रीक सर्वे करणार आहे.

श्री.राजू शिंदे : यापूवीच्या सर्वेत आरसीसी घर , वाहन असलेल्यांचा दारिद्रय रेषेमधे समावेश झाला,माती काम मोलमजुरी करण्यासाठी सकाळी आठ च्या अगोदर जातात व सायंकाळी ५ नंतर येतात ते यातून वंचीत राहिले

त्यासाठी सर्वे आठच्या अगोदर व सायंकाळी ५ च्या नंतर व्हावा.टीमवर्क मध्ये किमान वार्डनिहाय पुरेसे कर्मचारी दयावे एका वार्डात २-२ तरी द्यावे कमी वेळेत जास्त सर्वे होईल..वार्डाचे स.सदस्य यांना विश्वासात घ्यावे बायमॅट्रीक सर्वे कसा करणार आहे.

कार्य.अभियंता(बीओटी) : कुटूंबातील व्यक्तीनिहाय माहिती घेवून तीच व्यक्ती आहे का याची शहानिशा करण्यासाठी बायोमॅट्रीक सर्वे करणे जरूरी आहे.

श्री.राजू शिंदे :संस्थे मार्फत सर्वे करणार पैसे कोण देणार आहे.

कार्य.अभियंता(बीओटी) :भारतात सर्व ठिकाणी ही स्कीम चालू आहे यासाठी युएलबी मध्ये लोकल बॉडी त्यांनी सर्वे करून घ्यायचा त्यानंतर सेंन्ट्रल गव्हरमेंन्टकडून त्यासाठी प्रोवीजन होणार आपण सर्वे सुरू केलेला आहे त्यासाठी १.३६ कोटी प्राप्त आहे सर्वे नंतर कन्स्ट्रक्शन करावे लागणार त्याचा निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

श्री.राजू शिंदे :सर्वेचा भविष्यात उपयोग होत असेल तर मंजूरी दयावी.

कार्य.अभियंता बीओटी :ही स्कीम ५ वर्षे चालणार आहे त्यात सर्वे करायचा सर्वे झाल्यानंतर सेंन्ट्रल, स्टेट गव्हरमेंन्टकडून निधी प्राप्त होणार सर्वे करू नंतर डीपीआर सबमिट करावा लागणार आहे पायलेट प्रोजेक्ट , टेक्नीकल प्रोजेक्टचे काम करावे लागणार आहे.हे जोपर्यत करणार नाही तोपर्यत या महापालिकेकसाठी शेअर राहणार नाही.

श्री.राजू शिंदे :शासनाचा निधी मिळत असेल तर सर्वे करण्यास हरकत नाही परंतु जो सर्वे होईल तो ग्राहय धरणार आहे का ज्यांना घरकूल योजने अंतर्गत घर मिळणार त्यांचा समावेश आता होईल का उदा एका वार्डात १०० लोक पुर्वीचे दारिद्रय रेषेखाली आहे सर्वे केल्यानंतर ५०० संख्या झाली तर या सर्वांना लाभ मिळणार आहे का?

कार्य.अभियंता-बीओटी :या योजने अंतर्गत स्लम फ्रि सिटी तयार करायची सर्व लोकांचा समावेश करायचा आहे.जे जास्तीचे लोक येतील १०० टक्के सर्वे होणार

श्री.सुशिल खेडकर :दोन निविदा प्राप्त झाल्या काही कारणास्तव एकच निविदा ओपन केली असे करता येते का कोणत्या नियमाने खुलासा करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :राज्य शासन व केंद्र शासन अंतर्गत संपूर्ण देशास ही योजना राबविली जात आहे.यासाठी संपूर्ण खर्च शासन देणार आहे.यामध्ये ५३ घोषीत झोपडपट्टी व ११७ अनिधकृत वस्ती असे दिले आहे.सर्वे करतांना सर्व समाजाचा घटकांचा समावेश होईल याची काळजी घेतली पाहिजे प्रत्येक समाजामध्ये दारिद्रय रेषेखाली लोक असतांत त्यांचे उत्पन्न कमी असते.५ वर्षापूवी दारिद्रय रेषेखालील सर्वे केला ती आकडेवारी कमी आली राज्य व केंद्र शासनाचे उद्दिष्ठ आहे त्यातून सर्व तळागाळातील लोकांना सुविधा मिळावा याच ऐजन्सीने स्पेकचा सर्वे केला आहे.पुर्वी प्रमाणे सर्वे होत असेल तर चुकीचे होईल तीच एजन्सी आहे का पडताळून पहावे. सर्वे होत असतांना कुणी सुटू नये हीच आमची मागणी आहे.न्याय पध्दतीचा वापर झाला पाहिजे विभाग

प्रमुख म्हणजे जो सेल असेल त्यांचेवर जबाबदारी दयावी.सर्वे करीत असतांना स.सदस्यांना विश्वासात घ्यावे अंतिम मान्यता देतांना पुन्हा सर्वसाधारण सभेपूढे यावे.सर्वे करणारी एजन्सी जबाबदार असावी.वार्डातील सर्व लोकांना लाभ मिळावा याची अमलबजावणी काटेकोरपणे करावी.

श्री.संजय चौधरी :या योजनेच्या माध्यमातून १ लक्ष घरे येण्याची शक्यता आहे असे पेपरला आले या योजनेमूळे शहरातील स्लम भागाचा विकास होणार परंतु या योजनेचा डीपीआर तयार होणार आहे दोन एजन्सीचे टेंडर आले.ज्या एजन्सीला काम देणार ती मे. सीमा कंन्सलटंट एजन्सी आहे या एजन्सीने गुंठेवारी भागात काम केले ते कसे केले हे पडताळून पहावे. डीपीआर व्यवस्थीत तयार नसेल तर लाभार्थींना याचा लाभ होणार नाही त्यासाठी काम करणारी एजन्सीचा अनुभव लक्षात घेवून फिक्सींग करावे.

श्री.गिरजाराम हळनोर :शासनाची योजना तळागाळातील लोकापर्यत पोहचावी योजना राबवित असतांना सर्व लाभार्थींना फायदा होईल असे नियम असावे.या संदर्भात स.श्री.कृष्णा बनकर हे उपोषणास बसले होते स्लम भागातील त्या लोकांना फायदा घेण्यासाठी त्या लोकांकडे जागेची रजिस्ट्री, पीआर कार्ड असावे.परंतु हे लोक मुळात शासकीय जमिनीवर असतात नंतर डिक्लेर स्लम म्हणून घोषित होतात अशा प्रकारची अट यामध्ये असू नये. काम देतांना एजन्सी पडताळून पाहावी स.सदस्यांना आमदार व इतर लोकप्रतिनिधी त्यांना विश्वासात घ्यावे ख-या लाभार्थीचा समावेश व्हावा.

श्री.नासेर खॉन :स्पेकचे काम केले तीच ही एजन्सी आहे का ? सन २००२ मध्ये टॅक्स लावण्याचे काम या एजन्सीचे केले कमी जास्त टॅक्स लावलेला होता तीच ही एजन्सी आहे.

कार्य.अभियंता-बीओटी :याची पडताळणी करून घेतली जाईल स्पेक एजन्सी व ही सीमा एजन्सी वेगवेगळी आहे.

श्री.विजेंद्र जाधव :या एजन्सीने स्पेकचे काम केले होते गुंठेवारीमध्ये निष्कृष्ठ दर्जाचे काम केले या एजन्सीला काम देवू नये.रद्य करावे.

श्री.राजू शिंदे :पुर्वी सर्वे केला तीच एजन्सी असेल तर हे टेंडर रद्य करावे या एजन्सीला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे काल स.सदस्य श्री.बनकर हे उपोषणास बसले होते घरकूल योजना या शहरात व्यापक व्हावी त्यामध्ये जाचक अटी होत्या १९९५ च्या यादीत नाव असावे द्रारिद्रय रेषेचे कार्ड पाहिजे. स.सदस्य यांनी ५ वेळेस पत्र दिले त्यांना उत्तर दिले नाही व त्यांचे म्हणणे शासनापर्यंत पाठविले नाही.घरकुल योजना चांगली राबवायची असेल लाभार्थींना लाभ मिळवून दयायचा असेल तर ऐनवेळचा विषय ठेवलेला आहे हा विषय मंजूर करावा प्रशासनास आदेश करावे की महापालिकेच्या वतीने यास प्रशासकीय ठराव ठेवावा व त्यातील अटी शर्ती शिथील कराव्या की मनपा हद्दीत राहणा-या

लोकांना याचा लाभ मिळेल. १९९५ ची यादीत नाव असावे अट शिथील करावी सर्व समाजाचे झोपडपट्टीत दारिद्रय रेषेखाली येतात त्या सर्वांचा यात समावेश व्हावा.दुरूस्तीस शासनास पाठवावे. मा.महापौर व इतर पदाधिकारी यांचे शिष्टमंडळ जावून मा.मुख्यमंत्री किंवा या विभागाचे मा.सचिव असतील यांची भेट घेवून विनंती करवी की हे शहर भौगोलिकदृष्टया गुंठेवारीत येत नाही.सातारा सांगली कोल्हापूर या भागात गुंठेवारी जमिन विकलेल्या आहेत या शहरात २०x३० प्लॉट जागा विक्री केली नियम दिले ते लागू होणार नाही असे सांगावे यात अटी शिथील कराव्यात अशी दुरूस्ती करून प्रस्ताव प्रशासनाच्या मार्फत शासनाकडे पाठवावा.व सर्व समाजाच्या गरीब लोकांना लाभ झाला पाहिजे अशी कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी :क्र. ६ मध्ये सर्वेक्षण करण्यासाठी र.रू. ७.४८,९७०००/-अंदाजपत्रक तयार केले आर्थीक तरतुद उपलब्ध करून घेणेसाठी शासनास अहवाल दिला असे म्हटले.यापैकी गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ औरंगाबाद या विभागाकडुन वित्त नियंत्रण प्राधिकरण मुंबई यांचे कडुन फक्त १.३६ कोटी आले.पुढचा निधी येईल त्यानुसार टेंडर काढले का ?

कार्य.अभियंता(बीओटी) :पुर्ण कामाचे अंदाजपत्रक ७.४८ कोटीचे आहे शासनाकडे अहवाल पाठविला आहे शासनाचा १.३६ कोटी निधी प्राप्त आहे एजन्सीला सर्वेसाठी फक्त ७० लक्ष दयायचे आहे

श्री.संजय जोशी :सर्वेसाठी एजन्सीला ७० लक्षच देणार प्रस्तावात कुठेही नाही.

श्री.सुशिल खेंडकर :या कामाचा कालावधी किती एजन्सीकडे किती कर्मचारी असणार टेक्नीकल किती.

कार्य.अभियंता (स्लम) :टेक्नीकल स्टॉफ एक अभियंता, बायोमॅट्रिक टेक्नीशन्स , डिप्लोमा व्होल्डर ३ कर्मचारी पाहिजे.

श्री.त्रिंबक तुपे :गुंठेवारीत सर्वे केला त्यातही अशाच अटी शर्ती होत्या या एजन्सीने त्यावेळी काम केले का आता सर्वेसाठी या एजन्सीकडे कर्मचारी कोणता असणार गुंठेवारीचा सर्वे केला त्यावेळीही टेक्नीकल डिप्लोमा असलेले कर्मचारी असावे असे म्हटले होते परंतु त्यावेळचा सर्वे हा १०-१२ वी पास असलेल्या विदयार्थ्याकडून केला या ठरावात ज्या तृटी आहे त्या सर्व यात समावेश करून दुरूस्तीसह यावे दारिद्रय रेषेखाली येतात त्याना याचा लाभ व्हावा ज्यांचेकडे घरे ,गाडया आहेत त्यावी व काही शासकीय कर्मचारी यांची नावे सुध्दा यात दिसते सर्वे करतांना पुर्वनियोजन असावे अनेक कामगार स.७.०० वा.च्या आत घरातून बाहेर पडतात सायंकाळी येतात हे कामगार यातून वंचीत राहू नये याचीही दखल घ्यावी.एजन्सीला काम दिल्यानंतर त्या योजनेचा पाठपूरावा करावा.

श्री.समीर राजूरकर :यापूर्वी गुंठेवारी सर्वेक्षणाचे काम या एजन्सीने केले का स्पेकच्या ॲग्रीमेन्टमध्ये ही सिस्टम कंन्स्ल्टंन्ट कंपनी होती याची माहिती

घेतली का ज्यांनी नुकसान केले त्याच एजन्सीला पुन्हा काम दिले जात असेल तर  अर्थ नाही ज्यांना काम दिले त्यांनी वेळेत,चांगले व पुर्ण काम केले पाहिजे याचीही दखल घ्यावी.या एजन्सीने अगोदर काम केले का माहिती घ्यावी.केले  असेल तर काम देवू नये.

श्री.त्रिंबक तुपे : गुंठेवारी सर्वेचे काम या एजन्सीने केले का तपासावे शनिवार,रविवार अनेक कामगारांना सुट्टी असते या दिवशी सर्वेचे काम जातीने करावे स.सदस्य श्री.बनकर हे उपोषणास बसले होते त्यांनी पत्र दिले त्यात १०-१२ महत्वाचे मुद्ये दिले समाज कल्याण विभागाकडून निधी मिळण्यासाठी  पाठपुरावा होत नाही.हा निधी या लाभार्थीपर्यत पोहचवू शकत नसेल तर शोकातिकां,लाभार्थींना लाभ मिळवून दयायचा असेल तर नियोजन करावे या एजन्सीने गुंठेवारीत सर्वे करतांना काम कसे केले हे तपासावे गुंठेवारीच्या अनेक संचिका प्रलबींत आहे नागरीकानी सर्व माहिती दिली परंतु त्या सचिंका त्यांना अदयापही मिळाल्या नाही. त्या बाबतील पाठपुरावा झाला नाही त्यामुळे गुंठेवारीतून महापालिकेला उत्पन्न मिळाले नाही एका अर्थाने नुकसानच झाले हा प्रस्ताव मंजूर करतांना विचार करावा जर ही एजन्सी चांगले काम करणार नसेल तर काम करून घेणेची अपेक्षा या एजन्सीकडून करू नये.वार्ड कमेटी निहाय सर्वेचे काम दिले तर एकाच एजन्सीवर कामाचा बोजा येणार नाही हा विचार करावा.

श्री.पंकज भारसाखळे :माझ्या वार्डातील गुंठेवारीतील सर्वे केलेल्या १००० संचिका  आहेत नागरीक त्या संचिकेसाठी चकरा मारतात ७५० रू भरल्याची पावती त्यांचेकडे आहे याच एजन्सीने ते काम केले होते. गुंठेवारीतील किती लोकांच्या संचिका तयार केल्या त्यात ज्या तृटया असतील त्या बाबतीत त्या नागरीकांना कळविण्यात यावे. त्या संचिका निकाली काढाव्यात.

श्री.राजू शिंदे :एकाच एजन्सीला काम न देता प्रभाग समिती निहाय ६ एजन्सीला काम देणेसाठी टेंडर काढावे योजना प्रभावीपणे राबवावी असे वाटत असेल तर सर्वे कसा व केंव्हा करायचा महापालिकेने नियम करावे पूर्ण सर्वे करावा सर्व लाभार्थींना लाभ होइल तत्कालीन मंत्री महोदय श्री. चंद्रकांतजी हडोंरे यांनी घर कुल व इतर योजनेसाठी ९०० कोटी रूपये दिलेले आहे.प्रॉपर सर्वे करावा  स.सदस्यांना विश्वासात घ्यावे.हे टेंडर रद्य करावे

श्री.बाळासाहेब मुंडे :स्पेक कडे कोणत्या एजन्सीने काम केले होते.

कार्य.अभियंता (स्लम) :गुंठेवारीचे व स्पेक वेगवेगळे आहे.

श्री.समीर राजूरकर :गुंठवारीचा सर्वे कोणत्या एजन्सीने केला

श्री.गिरजाराम हळनोर :स्लम भागात जाऊन एक ऐजन्सी नागरीकाकडून पैसे घेऊन फॉर्म भरून घेत आहे टॉयलेट बांधून देणार , नळ देणार असे सांगते काही नागरीकाकडून मला माहिती मिळाली स.सदस्यांना माहिती नाही एजन्सी निघून गेल्यानंतर नागरीक स.सदस्यांकडे धाव घेतील-

.नेमकी एजन्सी कोणती आहे, कोणते काम करीत आहे माहिती दयावी.

श्री.समीर राजूरकर :गुंठेवारीचा सर्वे करणारी एजन्सी कोणती त्या एजन्सीच्या बाबतीत नागरीकांनी स.सदस्यांपर्यत तक्रारी केल्या सर्व पडताळणी करून टेंडर करायला पाहिजे कारण गुंठेवारीच्या सर्वेक्षणामध्ये नंतर अडचणी येतील पुन्हा त्याच कंपनीला काम देणे योग्य नाही.

श्री.संजय केनेकर :सर्वे करतांना एजन्सी कोणती हे स.सदस्यांना कळविले तर प्रशासनाला मदत होईल.गुंठेवारीत ७५०रूघेवून सर्वे केला त्यांचे रेकॉर्ड संचिका आजही मिळत नाही.विष्णुनगर नाथनगर अरिहंतनगर, बालाजीनगर तसेच मुंकूदवाडी , जयभवानीनगर गुंठेवारीतील वार्ड आहे त्या भागातील लोकांना सर्वे केलेल्या एजन्सीने फसविले. ती एजन्सी व सर्वे केलेल्या घराच्या संचिका मिळत नाही.नागरीक पावत्या घेवून स.सदस्याकडे येतात अधिका-यांना विचारणा केली असता एजन्सी निघून गेली नव्याचे संचिका करावी अशी उत्तरे मिळतात.गुंठेवारीत याच एजन्सीने सर्वे केला सर्वांचे मत आहे. या एजन्सीला रद्य करावे ७५०रू लोकांनी पैसे भरणा करून पावत्या घेतलेल्या आहे अशा एजन्सीवर फौजदारी गुन्हे दाखल करावे.

श्री.प्रफुल्ल मालाणी :कोणत्या वर्षापर्यंतच्या झोपडपट्टी यात घेतल्या ही निविदा सव्वा वर्षापुर्वीची असून ९ महिण्यानंतर उघडली फेर निविदा ७० लक्षाची घेत आहोत.अगोदर निविदा आल्या त्यावेळी याच एजन्सीने टेंडर भरलेले होते का ?फेर निविदामध्ये काय तृटी होत्या यात कोणत्या तृटी मिळवल्या ही एजन्सी सव्वा वर्षापुर्वीच्या दराप्रमाणे काम करण्यास तयार आहेत का ?

श्री.प्रमोद राठोड : पुर्ण शहरातील सर्वेसाठी ही निविदा काढली तसे न करता समान झोनवाईज विभागून निविदा काढावी ६ झोनमध्ये वेगवेगळया एजन्सीला काम देण्यात यावे. या एजन्सीच्या बाबतीत जी चर्चा झाली त्या प्रमाणे या एजन्सीची चौकशी करावी त्यानंतर काम दयायचे की नाही ठरवावे

श्री.राजू शिंदे :येणा-या बैठकीत झोनवाईज टेंडर काढून सविस्तर प्रस्ताव यावा.

मा.महापौर :सदरील योजना ही लाभदायी आहे.आपले शहर हे सन २०२० पर्यंत झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सर्वेक्षण करतांना स.सदस्यांना विश्वासात घेवूनच सर्वेक्षण करण्यात यावे जो दारिद्रय रेषेखाली सर्वे झाला तो पुर्णपणे चुकीचा झालेला आहे. वंचित लोकांची त्यात नोंद नाही हा सर्वे सकाळी ८ वाजेच्या अगोदर व सायंकाळी ५ वाजेच्या नंतर करण्यात यावा आणि टेंडर प्रोसीजरमध्ये प्रत्येक झोनवाईज टेंडर कढण्यात यावे एजन्सी नेमतांना त्य एजन्सीचा कामाचा पुर्व अनुभव लक्षात घेवुनच एजन्सी नेमावी गुंठेवारी विभागाचा अभिप्राय यसठी

घ्यावा पुढील सर्वसाधारण सभेत सविस्तर हा प्रस्ताव सादर करावा तसेच स्लम भागात खरेदीखताचे व पीआर कार्ड मिळणे कठीण असते त्यामुळे ही अट शिथील करावी या संदर्भात स सदस्य श्री कृष्णा बनकर उपोषणास बसले होते आपणही अट शिथील करावी दुरूस्तीसह हा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा हा विषय मंजूर करण्यात येतो. निविदा प्रक्रिया लवकरात लवकर काढावी.

<u>ठराव.:</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेच्या चर्चेनुसार शासकीय राजीव आवास योजने अंतर्गत शहरातील घोषित व अघोषित झोपडपट्टी मधिल शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणेसाठी औरंगाबाद महानगरपालिका हददीतील एकुण ५३ घोषित झोपडपट्टी आणि ११७ अनधिकृत वसाहतीचे प्रस्तावात नमुद पहिल्या टप्प्यातील सोशिओ एकोनॉमिक सर्वे,बायोमॅट्रिक सर्वे शहर हद्दीतील तांत्रिक कक्षासाठी स्लम भागाचे सर्वेक्षण करून माहीती संकलित करणे व वेब इनॅबल सिटी लेवल डाटा बेस व डाटा लाईन रिपोर्ट तयार इत्यादि सर्वेक्षणासाठी प्रभाग समितीनिहाय निवीदा काढण्यास तसेच गुंठेवारी विभागाचा अभिप्राय घेण्यास निविदेच्या वेळी एजन्सीच्या कामाचा अनुभव विचारात घेणे इत्यादिसह पुढील सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करण्यास मंजूरी देण्यात येते. तसेच झोपडपट्टी भागात खरेदी खत, पीआर कार्ड मिळणे कठीण असल्याने ही अट शिथिल करणे बाबत शासनास पत्र व्यवहार करण्यासही मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचे काम सुव्यवस्थीतपणे चालण्यासाठी २४० लिटर क्षमतेचे बिन्स खरेदी करणे आवश्यक आहे. मे. रामके एन्व्हायरो इंजिनिअर्स लि.या कंपनीने वन टाईम सप्लाय ॲटम या सदराखाली २४० लिटर क्षमतेचे ६६० नग डस्टबिन्स पुरवठा केले होते व करारानुसार वन टाईम सप्लाय ॲटम मधील अतिरिक्त लागणारे बिन्स मनपाने स्वखर्चाने खरेदी करावयाचे आहेत. सद्यस्थितीत संपुर्ण शहरातील किमान १००० नग २४० लिटर क्षमतेच्या बिन्सची आवश्यकता आहे.

ओटो मेक इंटरनॅशनल स्टॅन्डर्ड एच.डी.पी.ई, इंजेक्शन मोल्डेड २४० लिटर क्षमतेच्या डस्टबिन्स खरेदीसाठी ओटो कंपनीच्या दरपत्रकानुसार प्रतिनग रुपये ४८००/- दर अपेक्षित आहे. या दराने १००० नग डस्टबिन्स खरेदीसाठी रुपये ४८,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. हा खर्च १३ व्या वित्त आयोग निधी मधुन करण्यास मान्यता मिळाली तर जाहीर निविदा मागवुन खरेदी करण्यात येईल.

करीता १३ व्या वित्त आयोग निधी मधुन २४० लिटर क्षमतेचे १००० नग डस्टबिन्स खरेदी करण्यासाठी रुपये ४८ लक्षचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.राजू शिंदे :एक वर्षापासून स.सदस्य डस्टबिन्सची मागणी करीत आहे.रॅमकीचे नाव दाखवून आतापर्यत टाळण्यात आले यात कंपनीचे नाव दिले एखादया ठराविक कंपनी कडून घ्यावे असा जीआर आहे का?

श्री.संजय जोशी :आतापर्यंत टेंडर हे स्पेकीफिकेशननुसार विकत घ्यायचे असे येत होते यात कंपनीच्या नाव कसे दिले..

श्री.त्रिंबक तुपे : टेंडर मागविण्याची प्रोसेस काय असते नाव टाकून टेंडर देणे योग्य आहे का?

श्री.संजय जोशी : आधीचे ठराव स्पेसीफिकेशन प्रमाणे येत असे यासाठी अमुक साईजचे फायबर चे, प्लॅास्टीकचे डस्टबिन्स पाहिजे कंपनी कोणती ही असो , नंतर टेंडर काढायचे यात ओटो मेक इंटरनॅशनल कंपनीचेच नांव दिले स्पेसीफिकेशन यात का दिले नाही.

श्री.राजू शिंदे :अनेक दिवसापसून डस्टबीनची मागणी होते अचानक खरेदी करण्याचे टेंडर कुणाचे हित समोर ठेवून आले का

शहर अभियंता :शहराचे घनकचरा कलेक्शन व ट्रान्स्पोटेशनसाठी जेंव्हा निविदा काढली निविदा ही लोकल सेल्प गव्हरमेंन्ट या पीएमसीकडून हे टेंडर व आराखडा तयार केला होता इतर शहरामध्ये जसे ओटो कंपनीचे बीन्स घेत होते त्या प्रमाणे २००६ मध्ये जी निविदा काढली त्या टेंडरमध्ये ओटो मेक कंपनीचेच बीन्स दयाव्यात असे होते. त्यानुसार या प्रस्तावात नमुद केले .सभागृह जी मंजुरी देईल त्याप्रमाणे घेवू

श्री.राजू शिंदे : शासकीय किंवा सामाजिक संस्था होती का नाव का सुचविले.इतरही चांगल्या कपंनी आहेत.

शहर अभियंता :चांगली कंपनी आहे म्हणून नाव दिले स्पेसीफिकेशननुसारही टेंडर काढता येईल.यापुर्वी निधी उपलब्ध नव्हता आता १३ व्या वित्त आयोगातून घेण्यास मा.महापौर यांनी परवानगी दिली त्यानुसार प्रस्तावित केले

श्री.त्रिंबक तुपे :टेंडर व्हावे मोठया पेपरला दयावे.नियमानुसार टेंडर प्रोसेस व्हावी लवकरात लवकर कार्यवाही व्हावी.

श्री.राजू शिंदे :पुढील सभेत प्रस्ताव यावा जी स्टॅण्डर्ड कंपनी असेल त्यांचे नाव टाकावे ,ISO असावे कंपनी कोणती असेल वार्डात डस्टबीन्स कोणत्या वार्डात किती देणार सर्व वाटप होवून शिल्लक राहणार आहेत का हा अंदाज घेवूनच खरेदी करावे.विषय रद्य करावे पुन्हा तात्काळ आणावे.

श्री.संजय जोशी :जेंव्हा रॅमकीशी करार झाला तेंव्हा बिन्स मधून कचरा डायरेक्ट रिक्षात टाकून घेवून जायला पाहिजे असे होते परंतु आजही कचरा बीन्स मध्ये नेवून टाकला जातो व महापालिकेच्या कर्मचा-याना तो उचलावा लागतो.घेतल्या जाणा-या बीन्सचा किती फायदा होणार आहे.मुळ संकल्पना कर्मचा-यांनी हाताने कचरा उचलू नये म्हणून या बीन्स घेणार बीन्स उचण्यासाठी यंत्रणा आहे का.

श्री.सुर्यकांत जायभाये :रॅमकी एजन्सी ३० तारखेनंतर कचरा उचलणार नाही असे पेपरला आले तर या बीन्स कोणास देणार रॅमकीला दिले तर त्यावर त्यांचा हक्क सांगतील बीन्सही घेवून जातील रॅमकी कचरा उचलणार की नाही काम करणार नसेल तर पर्यायी व्यवस्था काय केली आहे.

श्री.राजू शिंदे :पुन्हा टेंडर प्रोसेस केली तर वेळ लागेल ,खर्च सुध्दा होईल त्यासाठी यातील नाव वगळून अशा प्रकारे स्टॅण्डर्ड कंपनीचे कोटेशन घेवून कार्यवाही करावी.

मा.महापौर :कंपनीचे नाव न टाकता निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात येते.

श्री.संजय केनेकर :१३ व्या वित्त आयोग निधीतून आणखी कशासाठी खर्च करणार ते सर्व एकाच वेळेस यावे

शहर अभियंता :कॉम्पॅक्टर जेंव्हा डस्टबीन्स जवळ येईल त्यावेळी डस्टबीन्स मधील कचरा डायरेक्ट कॉम्पॅक्टरमध्ये जाईल अशी व्यवस्था आहे.नागरीकांनी कचरा आजूबाजूला न टाकता डस्टबीन्समधे् टाकणेची सवय लावावी रॅमकी ३० तारखेपर्यंत काम करीत आहे नोटीस दिली होती परंतु त्यांचेशी दोन वेळेस बैठका घेवून आणखी ३ महिणे काम करण्याची विनंती केली बीन्स या महापालिकेच्या मालकीच्या राहतील.पुर्वीच्या ही बीन्स आहेत.

मा.महापौर : कंपनीचे नाव न टाकता निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचे काम सुव्यवस्थीतपणे चालण्यासाठी २४० लिटर क्षमतेचे इंटरनॅशनल स्टॅन्डर्ड एच.डी.पी.ई, इंजेक्शन मोल्डेड १००० डस्टबीन्स खरेदीसाठी रक्कम रूपये ४८,००,०००/-च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते तसेच सदर डस्टबीन्स १३ व्या वित्त आयोग निधीमधून घेण्यास आणि याची निविदा कोणत्याही कंपनीचे नावाचा उल्लेख न करता काढण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६२** :

Good Practice Scheme Phase-III हा प्रकल्प औरंगाबाद महानगरपालिका व बर्मिगहॅम सिटी काउन्सिल (U.K) यांच्यामध्ये चार वर्षापासून सुरू आहे. या प्रल्पाअंतर्गत मनपाच्या आयुक्तांसह काही अधिकाऱ्यांनी बर्मिगहॅम सिटी काउन्सिल येथ्ाील घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यास दौरा केलेला आहे व तसेच बर्मिंगहॅम सिटी काउन्सिल येथील काही अधिकाऱ्यांनी औरंगाबाद शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यास दौरा केलेला आहे. सदर प्रकल्प माहे ऑक्टोबर २०११ मध्ये संपुष्टात येत आहे. याचाच एक भाग म्हणून Door to Door Collection and Disposal of Solid Waste या अंतर्गत प्रचलित पध्दतींचे आदान-प्रदान करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका व Commonwealth Local Government Forum यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ व २३ सप्टेंबर २०११ रोजी हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे दोन दिवसीय Dissemination Seminar आयोजित करण्यात येत आहे. सदर चर्चासत्रासाठी Commonwealth Local Government Forum चे Secretary General यांचेसह यु.के. व दक्षिण आफ्रिकासहित भारताबाहेरून सुमारे वीस (२०) प्रतिनिधी व भारतातील औरंगाबादसहित इतर महानगरपालिकांचे मा.महापौर व आयुक्त यांचेसह मा.मुख्य सचिव (म.शा.) व प्रधान सचिव, नगर विकास विभाग, (म.शा)असे सुमारे ५०/६० प्रतिनिधी उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. म्हणजेच एकत्रित सुमारे ७०/८० प्रतिनिधी व अतिमहत्वाच्या व्यक्ती उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. सदर चर्चासत्राचा संपूर्ण खर्च Commonwealth Local Government Forum करणार आहे. तथापि, उपरोक्त

प्रमाणे सर्व अतिमहत्वाचे व्यक्ती हे प्रथमच औरंगाबाद शहरात येत असून व सदर चर्चासत्राचे आयोजनाचा एक घटक म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत दिनांक २२.०९.२०११ रोजी सर्व निमंत्रितांना/उपस्थित अतिमहत्वाच्या व्यक्तिंना रात्रीचे भोजन देणे आवश्यक वाटते. यासाठी व इतर काही अत्यावश्यक बाबींवरील खर्चासाठी सुमारे रूपये ५.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

करिता, वरील प्रमाणे Commonwealth Local Government Forum व औरंगाबाद महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ व २३ सप्टेंबर २०११ रोजी हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे चर्चासत्राचे आयोजन करणेस व चर्चासत्रासाठी उपस्थित सुमारे ७०/८० अतिमहत्वाच्या व्यक्तिंना दिनांक २२.०९.२०११ रोजी रात्रीचे भोजन औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत देणे व इतर अत्यावश्यक बाबींवरील खर्च यासाठी लागणाऱ्या रूपये ५.०० लक्ष अंदाजित खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

संवाद:

| | |
|---|---|
| श्री.संजय केनेकर | :एकुण् किती खर्च झाला खुलासा करावा. |
| प्र.आरोग्य वैद्य. अधि. | :Commonwealth आणि औरंगाबाद महानगरपालिका बर्मिगहॅम सिटी काउन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने Dissemination Seminar २२ व २३ सप्टेंबरमध्ये औरंगाबादमध्ये पार पडले त्याचा सर्व खर्च Commonwealth कडून करण्यात आला परंतु आपण यजमान पद भुषवल्यामुळे महापालिकेतर्फे महापौराकडून डिनर ऑरेंज केले त्यासाठी साधारणत: १.५० लक्ष खर्च आला |
| श्री.राजू शिंदे | :ठिक आहे परंतु याचे सदस्य झालोत का ? |
| प्र.आरोग्य वैद्य. अधि. | : ४० हजार भरणा करून मेंबरशीप स्विकारलेली आहे. |
| श्री.राजू शिंदे | :सदस्य होण्यासाठी १ वर्षामध्ये २ वर्ष मोफत देणार होते ते झाले का |
| प्र.आरोग्य वैद्य. अधि. | :त्यामध्ये २५ लक्षचा निधी पुढील आठवडयात मिळणार आहे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :४० हजार रू भरणा करून सदस्य व्हायचे होते ते झालो का. |
| प्र.आरोग्य वैद्य.अधि. | :पैसे भरले सदस्य झालो दोन वर्षाची मेंबरशिप मिळाली ३.१५ लक्ष खर्च झालेला आहे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :सेमीनर झाले त्यातून शहराच्या विकासासाठी काय आऊटफुट निघाले काय नियोजन असणार थोडक्यात माहिती देण्यात यावी. |
| मा.महापौर | :प्रत्यक्षात जितका खर्च झाला त्यास मंजुरी देण्यात येते |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट फोरम व औरंगाबाद महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ व २३ सप्टेंबर २०११ रोजी हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे डोअर टु डोअर कलेक्शन ॲण्ड डिस्पोजल ऑफ सॉलीड वेस्ट याबाबतीत आयोजित डिसिमिनेशन सेमीनारसाठी आलेल्या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.३५ कोतवालपुरा अंतर्गत बारापुल्ला गेट असून गेट समोर खाम नदीवर जूना पुल आहे. या गेटमधुन मोठया प्रमाणात वाहतुक होते. बऱ्याचदा त्याठिकाणी रहदारीमूळे वाहनांना तासनतास थांबावे लागते. गेट समोर असलेला खाम

नदीवरील पुल हा बऱ्याच वर्षापुर्वीचा असल्या कारणाने पुलाचे आयुष्यही संपलेले आहे. तसेच या भागात मोठया प्रमाणात वसाहती झाल्यामुळे, लोकसंख्येत खुप वाढ झाली आहे. त्यामूळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लगत आहे.

करीता नागरीकांना होणारा त्रास वाचविण्यासाठी गेटच्या डाव्या बाजूस खाम नदीवर नविन पुल बांधण्यात यावा. व या या कामासाठी तात्काळ अंदाजपत्रक तयार करण्यांत यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्री.विजेंद्र मुरलीधर जाधव, श्री.समीर सुभाष राजूरकर      अनुमोदक :श्री.कृष्णा बनकर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , वार्ड क्र.३५ कोतवालपुरा अंतर्गत बारापुल्ला गेटच्या समोर खाम नदीवर गेटच्या डाव्या बाजूस नविन पुल बांधण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६४:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वार्डातील रहिवासी श्री.वैभव रंगनाथ पांडे यांचा दिनांक ११.०१.२०११ रोजी एम.जी.एम हॉस्पीटल समोर महानगरपालिकेचे जेट मशीन वाहन क्र.एम.एच.२०-ए-टी ६३४७ या वाहनाने अपघात होऊन मृत्यु झालेला आहे. मयत पांडे यांच्या घराची आर्थिक परिस्थिती फार हलाखीची असुन घरातील कमविता माणुस गेल्याने त्यांच्या कुंटुबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

मयत श्री.वैभव रंगनाथ पांडे यांच्या कुंटुबियांना आर्थिक मदत देण्यांत यावी म्हणुन सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.(रु.एक लाख आर्थिक मदत देण्यांत यावी हि विनंती)

सुचक :श्री.हुशारसिंग चव्हाण      अनुमोदक : श्री.विरभद्र गादगे

संवाद :

श्री.राजू शिंदे :ज्यांचेकडून हा अपघात झाला त्यांचेवर काय कार्यवाही होत आहे संबधीत दारू पिलेले होते का पंचनामा झाला का आर्थीक मदत करते म्हणून यानंतरही असे प्रकार होतील ते होवू नये दखल घेलली पाहिजे.रॅमकीच्या वाहनाने दोन वेळेस अपघात झाले ठराव ठेवतांना ज्यांचेकडून अपघात झाला त्यांचे चौकशी बाबत काहीही नाही,सर्व चौकशी होणे आवश्यक आहे.

श्री.हुशारसिंग चव्हाण :पंचनामा झालेला आहे सकाळी हा अपघात झाला

श्री.राजू शिंदे :वाहनचालकाची चुक होती का इन्श्युरन्स,मिळाला का?१ लक्षची मदत करतो परंतु इतर रक्कम जास्तीची मिळविण्यासाठी आपण प्रयत्न केले का पुन्हा अशी घटना होणार नाही याची दखल घ्यावी संबधीतावर काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.त्रिंबक तुपे :ज्यांचेमूळे हे घडते ते काम करण्यात कसूर आहेत का ही माहिती स.पदाधिकारी यांचेपर्यत यायला पाहिजे मदत आपण करतो परंतु अशा वेळी चुक कोणाची हे तपासले पाहिजे भविष्यात अशा घटना घडणार नाही याची दखल घ्यावी

श्री.बाळासाहेब मुंडे :संबधीत अधिकारी यांनी चौकशी केली का? अहवाल आहे का?

श्री.विरभद्र गादगे :चौकशी करण्याचे काम प्रशासनाचे आहे त्या व्यक्तीची परीस्थितीच अशी आहे की १ लक्ष रू देवून त्यांचा मुलगा परत येणार नाही.

श्री.राजू शिंदे :आर्थीक मदत देण्यास विरोध नाही परंतु महापालिकेचीही काही यात जबाबदारी आहे त्या कर्मचा-याची जबाबदारी आहे की यानंतर असे अपघात होवू नये.

श्री.विरभद्र गादगे :घटना घडली तेंव्हा प्रशासनातील अधिकारी यांना तेथे बोलविले होते व प्रत्यक्षात सर्व माहिती दिली

मा.उपमहापौर :गेल्या ४ महिण्यात ३-४ लोकांना अशा घटनेत आर्थीक मदत दिली. सिडको नाटयगृहाचे गेट पडून घटना घडली त्यांनाही मदत केली ज्यांना धनादेश दिला ती व्यक्ती घरी पोहचत नाही त्याबरोबर लोक होते त्यांनी मॅक्स एजन्सीचा इन्श्युरन्स काढला त्यामध्ये ३५ टक्के कमीशन आहे मुंकूदवाडी भागात एका व्यक्तीला आर्थीक मदतीचा धनादेश दिला तेथे आपसांत लोकांचे वाद सुरू झाले.ही रक्कम रोख रक्कम न देता त्या व्यक्तीचे जे नातेवाईक असेल उदा.पत्नी किंवा मुले यांचे नावाचे ५-१० वर्षासाठी फिक्स डिपॉजीट केल्यास त्यावर व्याज वगैरे भविष्यात मिळेल.

श्री.संजय केनेकर :अशा घटना घडतात त्यावेळी निश्चितपणे मदत केली पाहिजे घटना कुणाच्या चुकीमूळे झाली कोणाकडून झाली याची शहानिशा व्हायला पाहिजे अशा घटना होणार नाही याची दखल घेतली पाहिजे.

मा.महापौर :नियमानुसार आर्थीक मदत करण्यात यावी कॅश रक्कम न देता ५ ते १० वर्षासाठी ती रक्कम फिक्स डिपॉजीट करण्यात यावे महापालिकेच्या कर्मचारी किंवा ठेकेदाराकडून अशी घटना घडली असेल तर ती परत होवू नये म्हणून त्या विषयी सुध्दा चौकशी करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.वैभव रंगनाथ पांडे यांचा दिनांक ११.०१.२०११ रोजी एम.जी.एम हॉस्पीटल समोर महानगरपालिकेचे जेट मशीन वाहन क्र.एम.एच.२०-ए-टी ६३४७ या वाहनाने अपघात होऊन मृत्यु झालेला असल्याने मयत पांडे यांच्या कुंटुबियांना नियमानुसार देण्यात येणारी आर्थीक मदतीची रक्कम ही न देता त्यांचे कुटूंबीयाच्या रोख स्वरूपात नावावर ५ ते १० वर्षासाठी मुदत ठेवीत (फिक्स डिपॉजीट) ठेवण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६५ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-१२ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक नमुद कामे

०१) वार्ड क्र.२९ मध्ये पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती व नविन लाईन टाकणे पान क्र. Ward-C-NW-२३ रक्कम रु. २.५ लाख

०२)वार्ड क्र.२९ मधील खुल्या गटारी दुरुस्ती करणे पान क्र.Ward-C-२७ वर रक्कम रु.२.५ लाख.

या कामाऐवजी

०१) वार्ड क्र.२९ अंतर्गत एस.टी कॉलोनी दर्गा जवळील चौराह जवळ हायमास्ट बसविणे रक्कम रु.४.०० लाख

०२) वार्ड क्र.२९ अंतर्गत शबिस्तान कॉलोनी येथील नाल्या लगत संरक्षित भिंत दुरुस्ती करणे रु. १.०० लाख सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्रीमती जरिना म.जावेद अनुमोदक : श्री.भुईगळ अमित सुधाकर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-१२ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक नमुद कामे

०१) वार्ड क्र.२९ मध्ये पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती व नविन लाईन टाकणे पान क्र. Ward-c-NW-२३ रक्कम रु. २.५ लाख

०२)वार्ड क्र.२९ मधील खुल्या गटारी दुरुस्ती करणे पान क्र.Ward-C-२७ वर रक्कम रु.२.५ लाख.

या कामाऐवजी

०१) वार्ड क्र.२९ अंतर्गत एस.टी कॉलोनी दर्गा जवळील चौराह जवळ हायमास्ट बसविणे रक्कम रु.४.०० लाख

०२) वार्ड क्र.२९ अंतर्गत शबिस्तान कॉलोनी येथील नाल्या लगत संरक्षित भिंत दुरुस्ती करणे रु. १.०० लाख ची कामे करण्यास मंजुरी देण्यात येते .वैधनिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.४६६ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, १ ऑगस्ट रोजी लो.अण्णाभाऊ साठे यांच्या ९१ व्या जयंतिनिमित्त अण्णाभाऊ साठे फौंडेशन सर्वपक्षीय शहर जयंती उत्सव समितीच्या वतीने दि. १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट पर्यंत विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. त्याकरिता १ लक्ष रुपये निधीची मदत देण्यात यावी, करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक :श्री.संजय केनेकर, श्री.प्रमोद राठोड, श्री.मिलिंद दाभाडे

अनुमोदक :श्री.मीर हिदायत अली, श्री.गजनान बारवाल, श्री.अशोक बेहडे, श्री.समीर राजूरकर, श्री. विजेंद्र जाधव, श्री.कृष्णा बनकर, श्रीमती ज्योती वाघमारे, श्रीमती संगिता आहिरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लो.अण्णाभाऊ साठे यांच्या ९१ व्या जयंतिनिमित्त औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे नियमाप्रमाणे १ लक्ष रुपये निधीची मदत देण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सौ.मिना दिलीप तिवारी, सहशिक्षीका, महानगरपालिका मिरा भाईदर येथे कार्यरत आहे. त्यांनी त्यांची पती श्री.दिलीप तिवारी, स्वेच्छानिवृत्त, औषधनिर्माता आरोग्य विभाग, मनपा मुंबई सध्या राहरणार औरंगाबाद हयाची बायपास सर्जरी झालेली असल्याने नेहमी त्यांना औषधोपचार करणे जरुरीचे आहे. परंतु दुसरे कोणती ही देखरेखीसाठी नसल्याने त्यांना हाल सोसावे लागत आहे. औरंगाबाद महानगरपालिका येथे बदली प्रकरणासाठी मिरा भाईदार शिक्षण मंडळाकडे बदली प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार मंडळाने दि.१७.०८.२०११ रोजी ठराव क्र.४२ पारित करुन सेवावर्ग करण्यास मंजुरी दिलेली आहे.

शासन निर्णयानुसार पती - पत्नी अंतर्गत पती किंवा पत्नी शासकिय सेवेत असणे जरुरीचे आहे. परंतु श्री.दिलीप तिवारी यांनी बायपास सर्जरीमुळे सेवानिवृत्ती घेतलेली आहे. करिता सौ.मिना दिलीप तिवारी यांची परिस्थिती बघता विशेष बाब म्हणुन त्यांची बदली औरंगाबाद महानगरपालिका येथे सेवावर्ग करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.प्रमोद प्र.राठोड, श्री.मिर हिदायत अली

अनुमोदक : श्रीमती कविता संजय जाधव, श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर

श्री.संजय केनेकर :टेक्नीकल मुद्ये यातील समजले नाही त्यामूळे नियमानुसार कार्यवाही करावी.

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सौ.मिना दिलीप तिवारी, सहशिक्षीका, महानगरपालिका मिरा भाईदर यांचे पती श्री.दिलीप तिवारी यांची बायपास सर्जरीमुळे सेवानिवृत्ती घेतलेली आहे. यांची परिस्थिती बघता विशेष बाब म्हणुन त्यांची बदली औरंगाबाद महानगरपालिका येथे नियमाप्रमाणे सेवावर्ग करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६८:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका मनपा अर्थसंकल्प २०११-२०१२, वार्ड क्र.७३ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यांत यावा वार्ड क्र.७३ मधील ज्या भागात डांबरीकरण करावयाचे काम मंजुर झाले तो भाग खोलगट असल्याने नेहमी पाणी साचलेले असते त्या ठिकाणी डांबरीकरण झाल्यानंतर रस्ते ताबडतोब खराब होणार असल्याने डांबरीकरणाचे काम रद्द करुन रस्ते चांगले तयार व्हावे म्हणुन डांबरीकरण ऐवजी सिमेंट रस्त्याचे कामासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| Ward E New work ३९ s.no.०२ | वार्ड क्र.७३ मध्ये विविध ठिकाणी पुर्न डांबरीकरण करणे रक्कम रुपये ०५ लक्ष | वार्ड क्र.७३ सिमेंट रस्ता तयार करणे. |

सुचक:श्रीमती सत्यभामा दामोधर शिंदे अनुमोदक:श्री.मीर हिदायत अली,श्रीमती निलाताई जगताप

**<u>ठराव.:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७३ मधील सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| Ward E New work ३९ s.no.०२ | वार्ड क्र.७३ मध्ये विविध ठिकाणी पुर्न डांबरीकरण करणे रक्कम रुपये ०५ लक्ष | वार्ड क्र.७३ सिमेंट रस्ता तयार करणे. |

वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्रं.४६९ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका मनपा अर्थसंकल्प २०११-२०१२ वार्ड क्र.४० मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| Ward-c New work २६ | १.बुक्कल गुडा येथे बिफ मार्केटसाठी दुकान बांधणे या कामास रक्कम रुपये १०.५० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.<br>२.नवाबपुरा येथे बिफ मार्केटसाठी दुकान बांधणे या कामास रक्कम रुपये १५.५० लाखाची तरतुद करण्यांत आलेली | १.वार्ड क्र.४० मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बांधणे.<br>२.वार्ड क्र.४० विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. |

सुचक :श्रीमती परविन कैसर खॉन अनुमोदक :श्री.मिर हिदायत अली, श्री.प्रमोद राठोड

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २०११-२०१२ वार्ड क्र.४० मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | २०११-२०१२ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| Ward-c New work २६ | १.बुक्कल गुडा येथे बिफ मार्केटसाठी दुकान बांधणे या कामास रक्कम रुपये १०.५० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.<br>२.नवाबपुरा येथे बिफ मार्केटसाठी दुकान बांधणे या कामास रक्कम रुपये १५.५० लाखाची तरतुद करण्यांत आलेली | १.वार्ड क्र.४० मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बांधणे.<br>२.वार्ड क्र.४० विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. |

वैधनिक कार्यवाही व्हावी .

**विषय क्र.४७०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५ येथील विविध विकास कामासाठी सन २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सदरील कामाऐवजी कामाच्या लेखाशिर्षका मध्ये बदल करुन सुधारीत काम करणेसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | प्रस्तावित काम | सुधारीत काम |
|---|---|---|
| १. | १.वार्ड क्र.५ अंतर्गत न्यु साईनगर येथे डांबरीकरण करणे अर्थसंकल्प पान क्र.जी.बी.आर ए-४ रक्कम रु ५ लक्ष<br>२.वार्ड क्र.५ मध्ये विविध ठिकाणी कॉक्रेटींग करणे अर्थसंकल्प पान क्र.जी.बी.आर.ए-४ रक्कम रु.५ लक्ष.<br>३.वार्ड क्र.५ पहाडसिंगपुरा भागात ड्रेनेज लाईन टाकणे | वार्ड क्र.५ अंतर्गत पहाडसिंगपुरा येथील नाल्यावर स्लॅब टाकणे रक्कम रु. १४ लक्ष. |

| | | |
|---|---|---|
| | अर्थसंकल्प पान क्र.जी.बी.आर-ए-७ रक्कम रु. ४ लक्ष | |

सुचक :सौ.पुष्पा देविदास सलामपुरे, श्री.बन्सी जाधव अनुमोदक :श्री.मोहन मेघावाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५ मधील सन २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र. | प्रस्तावित काम | सुधारीत काम |
|---|---|---|
| १. | १.वार्ड क्र.५ अंतर्गत न्यु साईनगर येथे डांबरीकरण करणे अर्थसंकल्प पान क्र.जी.बी.आर ए-४ रक्कम रु ५ लक्ष<br>२.वार्ड क्र.५ मध्ये विविध ठिकाणी कॉक्रेटींग करणे अर्थसंकल्प पान क्र.जी.बी.आर.ए-४ रक्कम रु.५ लक्ष.<br>३.वार्ड क्र.५ पहाडसिंगपुरा भागात ड्रेनेज लाईन टाकणे अर्थसंकल्प पान क्र.जी.बी.आर-ए-७ रक्कम रु. ४ लक्ष | वार्ड क्र.५ अंतर्गत पहाडसिंगपुरा येथील नाल्यावर स्लॅब टाकणे रक्कम रु. १४ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. ४७१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरात ३० सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर २०११ या दरम्यान ०५ व्या राष्ट्रीय चेसबॉल अजिंक्यपद स्पर्धा होणार असुन या स्पर्धेत देशभरातुन किमान १२ ते १५ राज्यातील महिला व पुरुष गटातील संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धासाठी राज्य भरात प्रसार व प्रचार करण्यासाठी संघटनेची आर्थिक बाजु कमजोर असल्याने तसचे स्पर्धासाठी किमान ०३ लक्ष खर्च अपेक्षित आहेत, चेसबॉल संघटनेचे पदाधिकारी यांनी औरंगाबाद महानगरपालिके तर्फे आर्थिक मदत मिळण्यासाठी विनंती केलेली आहे.

औरंगाबाद शहरात सदरील स्पर्धा होत असल्याने आपल्या महानगरपालिकेतर्फे रुपये ०१ लक्षाची आर्थिक मदत करण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रमोद प्र.राठोड, श्री.मिर हिदायत अली, श्री.पंकज भारसाकळे
अनुमोदक : श्री.राजु शिंदे, श्री.त्र्यंबक तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ०५ व्या राष्ट्रीय चेसबॉल अजिंक्यपद स्पर्धेस महानगरपालिकेतर्फे नियमाप्रमाणे रुपये ०१ लक्षाची आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

प्रश्न :

श्री.प्रमोद राठोड :मा.आयुक्त यांनी नगररचना विभागास संचिका गहाळ झाल्या प्रकरणी सिटीचौक पोलीस स्टेशनला तक्रार देण्यास सांगितले होते.सहा. नगररचनाकार यांनी तक्रार दिली ती अतिशय बोगस तक्रार दिल्याचे सगळीकडे कळाले सदरील पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी देखिल एक पत्र दिले होते की ,मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे आदेशाची पुर्तता करण्यासाठी अनावश्यक मजकुराचे लिखान करून औपचारीकता पुर्ण करणारा पत्रव्यवहार या

कार्यालयाशी करू नये अशा प्रकारची बोगस तक्रार देणा-या अधिका-यावर काय कार्यवाही करणार आहे.

**मा.महापौर** :मा.आयुक्तानी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म)** :तक्रार दिली ती योग्य वाटते का असा प्रश्न विचारला या बाबतीत दाखल केलेली तक्रार व पोलीस स्टेशनचे पत्र आले त्याची गांभीर्याने दखल घेतली तक्रार योग्य नाही अशी धारणा झाली तक्रार ही एका विशिष्ट बाबीवर अधारीत असायला पाहिजे होती.मोघम स्वरूपाची तक्रार दिली आहे.

**श्री.प्रमोद राठोड** :बोगस तक्रार देणारेवर काय कार्यवाही करणार पेपराला ही बातमी आली मनपाची बदनामी होत आहे.नगररचना विभागातील कोणत्या संचिका अद्याप सापडल्या नाहीत गहाळ झालेल्या आहे त्या बाबतीत पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करावे असे मा.आयुक्तांनी आदेशीत केले होते ज्यांनी तक्रार दिली त्यांनी तक्रार देतांना असे दिले की संचिका जागेवर उपलब्ध नाही आयुक्त महानगरपालिका यांनी आदेशीत केले की संबधीत पोलीस स्टेशनला जाऊन गुन्हा दाखल करावा.म्हणून आपणांस विनंती करण्यात येते की सदरील प्रकरणी तपास करावा व गुन्हा दाखल करावा. कुणावर गुन्हा दाखल करायचा प्रकरण काय अधिका-यांना माहित असतांना एक जबाबदार अधिकारी अशी मोघम तक्रार देत असेल तर योग्य नाही याचा अर्थ या संचिका गहाळ होण्या मागे या अधिका-याचा हात आहे या प्रकरणात कुणाला लपवीत आहेत मोघम तक्रार का दिली.

**उपआयुक्त(म)** :तक्रार काय दयायला पाहिजे अशी मोघम तक्रार का दिली कुणाच्या दबावामूळे कोणाच्या फायदयासाठी दिली ज्या प्रकारे तक्रार द्यायला पाहिजे तशी दिली नाही

**श्री.प्रमोद राठोड** अधिका-यावर काय कार्यवाही करणार आहे.अनावश्यक पत्रव्यवहार करू पोलीस स्टेशनकडून पत्र येते यात महापालिकेची बदनामी झाली आहे.

**उपआयुक्त(म)** :मोघम स्वरूपाची तक्रार या वस्तुस्थितीला नाकारता येत नाही.अशी तक्रार का दिली त्यामागे काय हेतू होता मा.आयुक्त आल्यानंतर निर्णय घेता येईल.संचिकाचे बाबतीत प्रशासनाने छाननी सुरू केली ४४१ संचिकाची यादी मिळाली.या सचिका विविध कर्मचा-यांच्या नावावर दिल्याचे व संचिका कुठे गेल्या नोद दिसून आली आणखीही संचिका असतील नाकारता येत नाही. यासाठी वेळ लागणार आहे. संचिका ज्यांचे ताब्यात असायला पाहिजे त्यांनी का ठेवल्या नाही ज्यांचे नावावर दिले परत जमा का केल्या नाही असे अनेक प्रश्न निर्माण झाले ८ दिवसात सर्व माहिती घेतली जाईल.

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | : ८ दिवसात उत्तर दिले जाईल असे म्हटले दिले नाही मागिल बैठकीत म्हटले होते अशी तक्रार का दिली कुणाला लपविले जाते प्रत्येक सभेला अधिकारी उत्तर देण्यास का नसतात प्रशासन त्यांना का पाठीशी घालत आहे. |
| श्री.राजू शिंदे | : बदली झाली तर चार्ज देण्याची काय पध्दत आहे |
| श्री.प्रमोद राठोड | :संचिका गहाळ होणे हा भाग वेगळा परंतु अशी तक्रार देवून या अधिका-यांनी कुणाला वाचविले |
| श्री.राजू शिंदे | :यात कोण दोषी शोधावे बदली झाली त्यावेळी त्यांचेकडील संचिका होत्या त्या चार्ज देतांना दिल्या नाही असे वाटते गुन्हा दाखल करायचे सांगितले त्यांचेवर गुन्हे दाखल न करता मोघम तक्रार दाखल केली. |
| श्री.प्रमोद राठोड | :बोगस तक्रार का दिली पोलीस स्टेशनला सांगीतले जाते की तपास करा गुन्हा दाखल करावा मा.आयुक्तानी लेखी दिले त्याप्रमाणे तक्रार दाखल का केली नाही मी दिनांक १०-०९-२०११ रोजी पत्र दिले संबधीत अधिका-यावर काय कार्यवाही केली. |
| श्री.त्रिंबक तुपे | :मागिल बैठकीतही हा विषय चर्चेला आला होता ४००० संचिकाचा विषय असतांना अधिकारीही बैठकीला उपस्थित नसतात तक्रार ही नावानिशी का दिली नाही मोघम तक्रार देवून कुणाला तरी लपवायचे प्रकार दिसतो.संचिका गहाळ होतात त्याची कुणीच दखल घेत नाही मीडीया मार्फत कळते की संचिका गहाळ आहेत परवानगी कुणी दिली कुठे दिली माहिती नाही एक अधिकारी खुलासा करण्यास उभे राहतात पुढील बैठकीत माहिती देवू सांगतात त्या बैठकीला ते हजर नसतात ,सन २००६ मध्ये ईआरपी सिस्टम लागू करून कॉम्प्युटराईज करणार होतो संचिकाची नोंद झाली असती गहाळ वगैरे हा प्रकार थांबविता आला असता ईआरपी सिस्टम अदयाप का सुरू झाली नाही त्यासाठी १.३१ कोटी खर्चही केले ही योजना चालू झाली असती संचिका गहाळ झाल्या नंसत्या संचिकाच्या बाबतीत निर्णय घ्यावा संबधीतावर कार्यवाही करावी ईआरपी सिस्टम चालू करण्या बाबतही आदेशीत करावे. |
| श्री.राजू शिंदे | :तारांकित प्रश्न झाला तर जातीने हजर राहतात येथेही हजर राहायला पाहिजे ज्या अधिका-यांच्या संबधीत विषय चालू आहे ते उपस्थित नाही खुलासा होणार आहे का दर महिण्यात एक सभा होते खुलासा देणेसाठी अधिकारी उपस्थित नसेल तर चर्चेला अर्थ नाही असे विषय अधिकारी गांभीर्याने घेत नसेल तर ते अधिकारी अस्थापनेवर नको चार्ज देण्याची पध्दत काय गहाळ संचिकामध्ये मोठे घोटाळे असावेत माझ्या मते त्या संचिका अधिकारी यांनीच संबधीत बिल्डरला दिल्या त्या कालावधीमध्ये त्या विभागात कोण संबधीत होते त्यांचेवर गुन्हे दाखल करावे. |

श्री.सुशिल खेडकर :ज्या संचिका गहाळ याचा अर्थ त्या बांधकामात सावळागोंधळ झाला,संचिका गहाळ झाल्या ,पोलीस केस होईल कार्यवाही होत राहिल वेळ लागेल परंतु आता त्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून किती परवानगी दयायला पाहिजे काम किती केले अनाधिकृत झाले असेल तर कार्यवाही करावी नवीन संचिका तयार कराव्यात.

श्री.राजू शिंदे :गहाळ संचिका कोणाच्या कार्यकाळात मंजूर झाल्या त्याचे अंतर्गत कोणते कर्मचारी याचा सविस्तर अहवाल मागवावा. ज्या संचिका गहाळ आहे अशा इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करावी जर अनियमितता दिसून आल्यास संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.संजय केनेकर : अधिकारी चार्ज देतात तेंव्हा त्यांचेकडे किती संचिका आहे नोंद असायला पाहिजे शासनाचे सीस्टम प्रमाणे अमलबजावणी होत नाही संचिका गहाळ नाही अधिका-याकडेच आहेत चौकशी करावी ज्यांचे बदल्या झाल्या त्या अभियंत्याकडे संचिका मिळतील यापुर्वी काही अधिका-याकडे संचिका आम्ही आणल्या प्रत्येकाच्या घरी फाईली आहेत.

श्री.प्रमोद राठोड :दोन प्रश्न किती संचिका गहाळ , कोणत्या झाल्या का झाल्या तसेच संबधीत अधिकारी यांनी पोलीस स्टेशनमध्ये अशी तक्रार का दिली.त्यांचेवर काय कार्यवाही करणार सहा.संचालक नगररचना पदावर जबाबदार अधिकारी आहे त्या पदावर राहण्याचा त्यांना अधिकार आहे का ?कार्यवाही होत नसेल तर सभागृह त्यांना पाठीशी घालते का प्रशासन लपवित आहे का असे वाटते.अनेकदा कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला झाली नाही मा.आयुक्तांनी सांगितल्यानुसार तक्रार का दिली नाही.

उपआयुक्त(म) :तक्रार मोघम स्वरूपात दाखल केली मागच्या वेळेसही मी हे बोललो यामागचा हेतू काय होता हे प्रशासनाच्याही लक्षात आले तक्रार देतांना घटना व घटनाक्रम काय हे दयायला पाहिजे संचिका कधी ,कोठे होती केंव्हा ती दिसून आली नाही त्यावेळचे जबाबदार अधिकारी कोण होते हे तक्रारीमध्ये यायला पाहिजे होते मा.आयुक्त हे प्रशिक्षणासाठी गेले ,आल्यानंतर या बाबतीत योग्य तो निर्णय घेतील ही तक्रार योग्य पध्दतीने गेली नाही प्रशासनाने मान्य केले दुसरी बाब म्हणजे नेमक्या किती संचिका गहाळ ,किती रेकॉर्डला व विभागाकडे याचा ताळमेळ बसविणे आवश्यक आहे.चार्ज देतांना यात दोन पध्दती असते मुळात जे रेकॉर्ड ठेवतो ते सहा पध्दतीप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे १,५,१०,३०,१०० वर्षाचा रेकॉर्ड ठेवणे जरूरीचे असते १०० वर्षापर्यंतचे रेकॉर्ड मध्ये यात जन्म-मृत्यूचा रेकॉर्ड ठेवावा लागतो त्या त्या कागदपत्राच्या प्रकारावरती त्यांचे आयुष्य ठरविलेले आहे.तितके दिवस जतन केले पाहिजे.जी १ वर्ष सांभाळायची त्यानंतर ती रेकॉर्ड रूमकडे पाठविली पाहिजे त्यानंतरची त्या त्या पध्दतीने पाठविली पाहिजे.कोणताही कर्मचारी असेल त्यांनी त्यांचा पदभार सोडण्यापूर्वी

त्यांचे कालावधीतील ज्या संचिका आहे टपाल त्यांचेहातावरती आहे त्यांची यादी करून ज्याला चार्ज दिला त्यांचेकडे ते देणे आवश्यक आहे.जे चार्ज घेतात त्यांनी सर्व कागदपत्र व पेजींग नुसार बरोबर आहे की नाही हे बघून घ्यावे.

श्री.राजू शिंदे :ही पध्दत अमलात आणली तर हा प्रकारहोणार नाही.मा.आयुक्त उपस्थित नाही परंतु संबधीत विभाग प्रमुख येथे उपस्थित असायला पाहिजे होते

उपआयुक्त (म) :संबधीत अधिकारी यांना मा.आयुक्त यांनी कोर्ट प्रकारणाच्या बाबतीत दिल्ली येथे पाठविले आहे.

श्री.प्रमोद राठोड :बैठकीच्या वेळीत त्यांना कामासाठी पाठविले जात असेल व येथे उत्तर देण्यास कुणी नसेल तर सभा आयोजित करण्याला अर्थ नाही मागिल बैठकीत ८ दिवसात उत्तर दिले जाईल असे म्हटले होते मागिल बैठकीत ते उत्तर देण्यास उभे राहिले नाही उपअभियंता यांना सांगितले त्यांना उत्तर दयायचे नाही आजही उपस्थित नाही.

श्री.राजू शिंदे :विषयपत्रिका ७ दिवस अगोदर मिळते प्रश्न त्या सोबत असतात काय उत्तर दयायचे हे त्या त्या विभागाकडे अगोदरच माहित असते स.सदस्य प्रश्न विचारतात उत्तर देत नाही अधिकारी उपस्थित नसतात सभागृहाचा अवमान आहे.महत्वाचे कामा निमित्ताने गेले असेल ठिक आहे प्रत्येक वेळेस अधिकारी उपस्थित नसेल तर योग्य नाही जे उपस्थित नसतात त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.त्रिंबक तुपे :२००६ मध्ये ईआरपी सिस्टमला मंजूरी दिली आजपर्यत ही सिस्टम का चालू केली नाही.प्रशासनाची नेमकी भुमिका काय आहे.६ वर्षात ही सिस्टम चालू होत नाही तर खर्च का केला या सिस्टीम अंतर्गत महत्वाचे विभागाचे संगणकीकरण होणार होते सरळ स्वच्छ कारभार सुरू झाला असता एका विभागात किती दिवस संचिका होती हे कळाले असते एखादया संचिकेबाबत ४ दिवसाचा वेळ दिला असता तर ती संचिका ४ दिवसात या सिस्टीमनुसार निकाली काढावी लागली असती. इतक्या संचिका गहाळ झाल्या नसत्या पुढील सभेपर्यत ही सिस्टम चालू व्हावी.

श्री.राजू शिंदे :मा.आयुक्त व संबधीत विभाग प्रमुख आज नाही तोपर्यंतहा विषय स्थगित ठेवावा मा.आयुक्त आल्यानंतर या प्रकरणी सखोल चौकशी व्हावी हा विषय कडेस लावावा

श्री.प्रमोद राठोड : बोगस तक्रार देणा-या अधिका-यावर काय कार्यवाही करणार हे क्लिअेर झाल्यानंतर पुढील सभा चालवू देवू.

श्री.त्रिंबक तुपे :रोपळेकर हॉस्पीटल ते चेतक घोडा पर्यंतच्या रस्त्याच्या कामाबाबत मी पत्र दिले त्या संदर्भात प्रशासनाकडून उत्तर आले की सदर रस्ता हा डिफर पेमेंन्टवर ६ रस्त्यापैकी घेण्यात आला होता या रस्त्याची मान्यता २००७ मधील आहे ४ वर्षात या रस्त्याचे काम का केले नाही.ज्या एजन्सीने काम केले नाही व त्यानंतर या एजन्सीला काम

दिले का असा प्रश्न दिला होता काम केलेले आहे असे उत्तर मिळाले या रस्त्याची एक बाजूचे काम राहिले आहे किती दिवसात सुरू करणार आहे

शहर अभियंता :एकूण सहा रस्ते डिफर पेमेंन्टवर घेतले त्यातील हा एक शेवटचा रस्ता राहिला होता काम सुरू केले होते परंतु मध्यतंरीच्या काळात आर्थीक परीस्थिती बरोबर नव्हती मागिल दोन वर्षाचे ३० टक्के पेमेंन्ट त्या ठेकेदारास मिळाले नव्हते म्हणून काम थांबविले आता पेमेंन्ट दिले आहे १५ ऑटोंबर पर्यंत काम सुरू होईल

श्री.त्रिंबक तुपे :हा रस्ता पूर्ण केल्याशिवाय त्या ठेकेदारास दुसरे काम देवू नये.

शहर अभियंता :ठिक आहे अगोदरचे काम पुर्ण करून घेतले जाईल.

श्री.राजू शिंदे :पॅचवर्क काम चालू करावे स.पदाधिका-यांनी मागणी होती त्यावेळी सुरू केले नाही आता काही ठिकाणी काम चालू आहे एका ठिकाणचे काम थांबविले कारण टेंडर झाले काम सुरू केले सदस्यांना माहित नाही २.५० कोटीचे काम दोन एजन्सीला दिले एक एजन्सीला १० व एका एजन्सीला १३ काम मिळाले. टेंडर अबाऊ , बिलो आले असेल ते आल्यानंतर अधिकारी वाटाघाटी करतात एका एजन्सीला १० कामे मिळाले कामाचे स्वरूप एकच आहे.परंतु प्रत्येक कामात अबाऊने टक्केवारी दिली आहे.दुस-या एजन्सीचे सर्वात कमी अबाऊ १० टक्के व सर्वात जास्त अबाऊ १५ टक्के आहे दुसरे एका एजन्सीचे सर्वात कमी अबाऊ १० टक्के तर सर्वांत जास्त अबाऊ २० टक्के.काम एकच एजन्सी करते एकाच शहरात आहे असे वेगवगळे दर का आले हे पेपरला छापून येणार यात नगरसेवक बदनाम होणार एकाच एजन्सीला १० कामे दिली तर एकाच दराने करावे लागतील असे सांगावे एकाच एजन्सीचे दर वेगवेगळे का आले याचा खुलासा करावा.

शहर अभियंता :संचिका बघीतल्यानंतर योग्य ते उत्तर देता येईल.दरामध्ये फरक आहे असे सदस्यांचे म्हणणे आहे.

श्री.राजू शिंदे :वाटाघाटी करतांना दर एकच ठेवावे अबाऊ जे आले ते सर्व कामासाठी एकच ठेवावे.

शहर अभियंता :टेंडर काढले दर आल्यानंतर ते अंदाजपत्रक कोणत्या वर्षातील आहे आता कोणते डीएसआर चालू आहे तुलना करतो त्यादरानुसार प्रस्तावित करीत असतो.दोन कामाच्या दरात जो फरक असतो तो यामूळे की दोन्ही कामामध्ये ॲटम वेगवेगळे असतांत त्यामूळे दर वेगवेगळा होतो

श्री.गिरजाराम हळनोर :पॅचवर्कचे काम आहे खडी ,बारीक कछ,व डांबर लागते

शहर अभियंता :निविदेमध्ये जो दर येतो तो दर जे अंदाजपत्रक केले ते वर्ष व सध्याचा जो डीएसआर चालू आहे त्या वर्षाची तुलना केली जाते जो

| | |
|---|---|
| | तुलनात्मक दर येतो त्याची तुलना केली जाते.डाबंराचा दर ३५०० ऐवजी ४५०० झालेला आहे त्यामूळे हा फरक दिसून येतो. |
| श्री.राजू शिंदे | :डांबराचे दर वाढले तर सर्व कामाच्या निविदामध्येच फरक यायला पाहिजे एका ठिकाणी चांगले व दुस-या ठिकाणी निष्कृष्ठ काम करणार काय ? |
| शहर अभियंता | :संचिका बघून सांगता येईल ॲटम वेगवेगळे असतात.काही मध्ये २ ॲटम तर काहीमध्ये ५ असतात. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :डिएसआर वाढले असेल तरी एका कामात १० व दुस-या त्याच कामासाठी २० टक्के दर कसे असू शकतात. |
| श्री.राजू शिंदे | :प्रत्येक वार्डात वेगवेगळे दर येतील .मा.पदाधिकारी सांगतात तेंव्हा काम सुरू होत नाही प्रशासनाच्या मनात आले तेंव्हाच काम सुरू होते काम एकच आहे सारखेच दर असावे. |
| मा.महापौर | :यापूढे अशा पध्दतीने काम होवू नये. |
| श्री.राजू शिंदे | : आर्थीक नुकसान करणारा हा विषय आहे.भविष्यात ४० टक्के अबाऊने कामे जातील.वार्ड अभियंता यांना बोलवावे अशा पध्दतीने कामे झाली आहे मटेरीयल एकच आहे दर वेगवेगळे का खुलासा घ्यावा. |
| शहर अभियंता | :संचिका बघून योग्य तो निर्णय घेवू नसता आपण ते रद्य करू |
| श्री.राजू शिंदे | :पॅचवर्क होत असतांना काळजी घेतली पाहिजे त्या त्या वार्डाचे अभियंता, कार्य.अभियंता तेथे उपस्थित असायला पाहिजे स.सदस्यांना सुध्दा कुठे काम चालू आहे माहित नाही.जेथे काम चालू आहे तेथे संबधीत विभागाचे अधिकारी कर्मचारी असायला पाहिजे. |
| श्रीमती कला ओझा | :गणपती उत्सवच्या वेळी काही भागात पॅचवर्क केले कामे सुरू होतात त्यावेळी गारखेडा भागात होत नाही नवरात्र उत्सवच्या वेळी विशेष कामे सुरू होतात आमच्या वार्डात पॅचवर्कचे काम करावे जेथे पूर्वी काम झाले तेथेच पुन्हा होत असल्याचे दिसून येते. |
| श्री.राजू शिंदे | :स.सदस्यांना त्यांचे वार्डात होत असलेले कामाची माहिती मिळत नाही त्याचे हे उदा.आहे. त्यांना वाटेल तेवढेच खड्डे बुजविले जाते स.सदस्यांना विश्वासात घेतले जात नाही. |

## पुरवणी विषय

| | |
|---|---|
| मा.महापौर | : विषय मंजूर विषय क्र. ४७२ ते ४७७ मंजूर |

**विषय क्र. ४७२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२२ नारेगांव येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात वार्ड क्र.२२ विविध ठिकाणी जलवाहिणी टाकणे साठी अर्थसंकल्पात पान क्र. जीबीआर-बी-९ भांडवली कामे या शिर्षकांखाली ६० लक्ष तरतुद ठेवण्यांत आलेली आहे. सदरील कामाऐवजी सुधारीत काम करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक १७.२.२०११ रोजी विषय क्र.२२८ अन्वये मंजुर करण्यात आला आहे. तथापी खालील दोन्ही सुधारीत कामे रद्द

करुन प्रभागातील विविध ठिकाणी २००, १५०, १०० मि.मि. व्यासाची डी.आय.के. ९ जलवाहिणी टाकण्यासाठी वळती करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

१.मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी नारेगाव येथे दोन खोल्या बांधणे. रु. २० लक्ष.

२.शामप्रसाद मुखर्जी सांस्कृतीक सभागृहाच्या समोर पत्राचे शेड व कंपाऊड वॉल व इतर कामे करणे रु. २० लक्ष.

सुचक :श्री.मनिष चंद्रकांत दहिहंडे अनुमोदक :श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२२ नारेगांव येथील विकास कामासाठी विविधा ठिकाणी जलवाहिनी टाकणेसाठी अर्थसंकल्पात पान क्र. जीबीआर-बी-९ भांडवली कामे या शिर्षकांखाली ६० लक्ष तरतुद ठेवण्यांत आलेली आहे. सदरील कामाऐवजी १.मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी नारेगाव येथे दोन खोल्या बांधणे. रु. २० लक्ष. २.शामप्रसाद मुखर्जी सांस्कृतीक सभागृहाच्या समोर पत्राचे शेड व कंपाऊड वॉल व इतर कामे करणे रु. २० लक्ष. सुधारीत काम करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक १७.२.२०११ रोजी विषय क्र.२२८ अन्वये मंजुर करण्यात आला आहे. तथापी वरील कामाऐवजी प्रभागातील विविध ठिकाणी २००, १५०, १०० मि.मि. व्यासाची डी.आय.के. ९ जलवाहिणी टाकण्यासाठी वळती करण्यास लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पात सहकार नगर चौक-शहानुरमियाँ-एकताचौक या विकास रस्त्यावर ३०० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामाकरीता ‘‘भांडवली कामे जलनि:सारण’’ या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २२.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आली आहे. सदरील रस्त्याचा विकास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत झाला असुन रस्त्याच्या बाजुने उपलब्ध असलेल्या जागेवरून पाणीपुरवठा लाईन व विद्युत केबल टाकण्यात आलेले आहेत. त्यामुळे रस्त्यालगत ड्रेनेज लाईन टाकणे शक्य होत नाही व आवश्यक तेथे इतर तरतुदीमधुन ड्रेनेज लाईनही टाकण्यात आली आहे. त्यामुळे या कामाची आवश्यकता नाही.

करीता या कामाकरिता उपलब्ध असलेल्या रक्कम रूपये २२.०० लक्षच्या तरतुदीमधुन खालील दर्शविलेली कामे प्रस्तावित करण्यात यावीत.

| | | |
|---|---|---|
| १. | वार्ड क्र ८८ मधील विविध खुल्या जागेचा विकास करणे | - रू. १०.०० लक्ष |
| २. | वार्ड क्र ८९ मध्ये देखभाल व दुरूस्तीची कामे करणे | -रू.२.०० लक्ष |
| ३. | वार्ड क्र ८९ मधील उद्यानाच्या संरक्षित भिंतीची दुरूस्ती करणे | - रू.२.०० लक्ष |
| ४. | वार्ड क्र ८९ मधील विविध उद्यानात विकास कामे करणे | -रू. ८.०० लक्ष |

तरी वरील प्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदल करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.गिरजाराम हाळनोर अनुमोदकः सौ.साधना सुरडकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पात सहकार नगर चौक-शहानुरमियाँ-एकताचौक या विकास रस्त्यावर ३०० मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामाकरीता ‘‘भांडवली कामे जलनि:सारण’’ या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २२.०० लक्षची

तरतुद ठेवण्यात आली आहे या कामाऐवजी खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस मंजुरी देण्यांत येते,

१. वार्ड क्र ८८ मधील विविध खुल्या जागेचा विकास करणे - रू. १०.०० लक्ष
२. वार्ड क्र ८९ मध्ये देखभाल व दुरूस्तीची कामे करणे -रू.२.०० लक्ष
३. वार्ड क्र ८९ मधील उद्यानाच्या संरक्षित भिंतीची दुरूस्ती करणे - रू.२.०० लक्ष
४. वार्ड क्र ८९ मधील विविध उद्यानात विकास कामे करणे -रू. ८.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२६ अंतर्गत असलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर चौक ते लहुजी साळवे चौक (बळीराम पाटील) दरम्यानच्या अमोल प्रोव्हीजन समोरील चौकास "राजे छत्रपती चौक" असे नामकरण करण्याची मागणी प्रभागातील नागरीकांनी केलेली आहे.

करीता वरील नुसार प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक: सौ.प्राजक्ता मंगेश भाले अनुमोदक: श्री.विरभद्र गादगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२६ अंतर्गत असलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर चौक ते लहुजी साळवे चौक (बळीराम पाटील) दरम्यानच्या अमोल प्रोव्हीजन समोरील चौकास "राजे छत्रपती चौक" असे नांव देण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, स्वामी विवेकानंदनगर मधील नागरीकांनी बी सेक्टर चे नामकरण करून सदरील सेक्टरला राजमाता जिजाऊ कॉलनी असे नाव देण्यासाठी वारंवार मागणी करीत आहे. नागरीकांची मागणी लक्षात घेता स्वामी विवेकानंदनगर मधील बी सेक्टरला राजमाता जिजाऊ कॉलनी असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक:श्री.मोहन मेघावाले,श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे
अनुमोदक:सौ.प्राजक्ता भाले, श्री.हुशारसिंग चव्हाण

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वामी विवेकानंदनगर मधील बी सेक्टर चे नामकरण करून राजमाता जिजाऊ कॉलनी असे नाव देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी..

**विषय क्र. ४७६ :**

जिल्हा व्यापारी महासंघाची संस्था आपल्या शहरातील सर्व व्यापारींनी स्थापन केलेली नोंदणीकृत संस्था असुन या शहरामध्ये अधिकृत स्वत:चे कार्यालय नाही.

आपल्या म.न.पा.त दिनांक १ जुलै २०११ पासुन स्थानिक संस्था कर लागु करण्यात आला हा कर यशस्वी करण्याकरीता व व्यापाऱ्याची नोंदणी करण्याकरीता जिल्हा व्यापारी महासंघाचे पदाधिकारी सदस्यांनी फार मोठा सिंहाचा वाटा उचलला व म.न.पा ला अपेक्षापेक्षा जास्त महसुल मिळविण्यात सहभागी झाले.

जिल्हा व्यापारी महासंघाने मागणी केल्याप्रमाणे त्यांना शहरातील योग्य ठिकाणी महापालिकेची जागा नाममात्र भाडे पट्टयावर देण्यात यावी.

सुचक:श्री.त्र्यंबक तुपे, श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.संजय केनेकर, श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक: श्री.समीर राजुरकर, श्री.मिर हिदायत अली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म.न.पा.त दिनांक १ जुलै २०११ पासुन स्थानिक संस्था कर लागु करण्यात आला हा कर यशस्वी करण्याकरीता व व्यापाऱ्याची नोंदणी करण्याकरीता जिल्हा व्यापारी महासंघाने मागणी केल्याप्रमाणे त्यांना शहरातील योग्य ठिकाणी महापालिकेची जागा नाममात्र भाडे पट्टयावर देण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.८३ करीता अर्थसंकल्प सन २०११-१२ मध्ये वार्ड कार्यालय इ-न्यु वर्क अंतर्गत शहरी भागात रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क या लेखाशिर्षातंर्गत पान क्र.३९ अ.क्र.९ वर वॉड क्र.८३ मध्ये अंतर्गत रस्त्यावर पडलेली माती उचलुन लेव्हल करणे असे लेखाशिर्ष आहे. त्याऐवजी वॉर्ड क्रं. ८३ मध्ये विविध ठिकाणी किरकोळ व फुटकळ कामे करणे असे लेखाशिर्ष बदलणेस प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.सुर्यकांत जायभाये अनुमोदक:श्री.जगदीश सिध्द

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८३ करीता अर्थसंकल्प सन २०११-१२ मध्ये पान क्र.३९ अ.क्र.९ वर वॉड क्र.८३ मध्ये अंतर्गत रस्त्यावर पडलेली माती उचलुन लेव्हल करणे असे लेखाशिर्ष आहे. त्याऐवजी वॉर्ड क्रं. ८३ मध्ये विविध ठिकाणी किरकोळ व फुटकळ कामे करणेस मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७८** :

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, दिनांक १/१०/२०११ ते ३०/९/२०१२ या कालावधीसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्यीत रहदारी फी (पारगमन शुल्क) वसुलीकरिता खाजगी अभिकर्ता नियुक्तीसाठी दिनांक १८/८/२०११ च्या वर्तमानपत्रात टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक १३/९/२०११ पर्यंत ई टेंडरिंगव्दारे एकूण सात (७) निविदांची विक्री झाली होती,त्यापैकी दोन(२)निविदा प्राप्त झाल्या. ई टेंडरिंगव्दारे प्राप्त निविदा दिनांक १९/०९/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात आल्या. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) मे.विपूल ऑक्ट्राय सेंटर, दहिसर, मुंबई
२) मयुर इंटरप्राईजेस, मालेगांव, जि.नासिक

रहदारी फी (पारगमन शुल्क) वसुलीच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार १) मे.विपूल ऑक्ट्राय सेंटर,दहिसर,मुंबई २) मयुर इंटरप्राईजेस, मालेगांव, जि.नासिक यांनी निविदेतील आवश्यक कागदपत्राची पुर्तता केलेली असल्याने सदरच्या दोन्ही एजन्सींचे ई टेंडरिंगव्दारे प्राप्त झालेले **कमर्शियल-बीड** (Commercial bid) उघडण्यात आले. ई टेंडरिंगव्दारे उघडण्यात आलेल्या रहदारी फी (पारगमन शुल्क) च्या निविदेतील देकार रक्कमेचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**रहदारी फी (पारगमन शुल्क) निविदेतील प्राप्त झालेल्या देकार रक्कमेचा तुलनात्मक तक्ता**

| अ.क्र. | एजन्सींचे नांव | एकूण देकार रक्कम |
|---|---|---|
| ०१ | मे.विपूल ऑक्ट्राय सेंटर, दहिसर, मुंबई | १५,३०,४५,०००/- |
| ०२ | मयुर इंटरप्राईजेस, मालेगांव, जि.नासिक | १८,२३,००,०००/- |

वरील प्राप्त निविंदापैकी मयुर इंटरप्राईजेस, मालेगांव, जि.नासिक यांनी सर्वात जास्त (Highest bid) म्हणजेच रक्कम रुपये १८,२३,००,०००/- (अक्षरी रुपये अठरा कोटी तेवीस लक्ष फक्त) चा सर्वाधिक देकार दिलेला आहे.

त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ च्या अनुसूचि-'ड' मधील प्रकरण-८ चे नियम-३५ आणि कलम-१४७,कलम-४६६(१) च्या (अ) मधील (फ) व उपकलम-२ मधील तरतुदींच्या अधिन राहून दिनांक ०१/१०/२०११ ते ३०/०९/२०१२ या कालावधीसाठी सर्वाधिक (Highest bid) देकार रक्कम देणारी मयुर इंटरप्राईजेस, मालेगांव, जि.नासिक यांना रहदारी फी (पारगमन शुल्क) संकलन करण्यासाठी **"रहदारी फी** (पारगमन शुल्क) **संकलन अभिकर्ता"** म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.गिरजाराम हळनोर : चांगले रेट दिलेले आहे यांचेकडून वेळेवर पैसे मिळाले नाही तर दंड ही वसुल करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत रहदारी फी (पारगमन शुल्क) वसुलीकरिता प्राप्त निविंदापैकी सर्वात जास्त दराची (Highest bid) मयुर इंटरप्राईजेस, मालेगांव, जि.नासिक यांची रक्कम रुपये १८,२३,००,०००/- (अक्षरी रुपये अठरा कोटी तेवीस लक्ष फक्त) च्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ च्या अनुसूचि-'ड' मधील प्रकरण-८ चे नियम-३५ आणि कलम-१४७,कलम-४६६(१) च्या (अ) मधील (फ) व उपकलम-२ मधील तरतुदींच्या अधिन राहून दिनांक ०१/१०/२०११ ते ३०/०९/२०१२ या कालावधीसाठी रहदारी फी (पारगमन शुल्क) संकलन करण्यासाठी **"रहदारी फी** (पारगमन शुल्क) **संकलन अभिकर्ता"** म्हणून नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७९**:

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथे मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय उभारणे करीता महानगरपालिका अर्थ संकल्प २०१०-११ अंतर्गत रक्कम रु. ५०.०० लक्षची विशेष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सदरील प्रकरणी प्रशासकीय कार्यवाही त्वरीत सुरु करणेसाठी मा. महापौर यांनी दिनांक १८/१२/२०१० रोजी पत्र दिले. त्यानुसार प्रकरणात त्वरीत कार्यवाही सुरु करण्यात आली व कामास प्रत्यक्ष सुरुवात म्हणुन महानगरपालिका पॅनल वरील वास्तुविशारद श्री. एन.आर.वर्मा यांची या प्रकल्पासाठी नियुक्ती करण्यता आली. त्यानंतर प्रकल्पाची पूढील दिशा व कामास गती मिळण्यासाठी दिनांक १६/०३/२०११ रोजी समिती गठीत करण्यात आली असून समितीचे अध्यक्ष मा. महापौर, समिती सदस्य सर्व स. पदाधिकारी, मुक्ती लढयातील सहभागी व्यक्तीकडुन मार्गदर्शन व त्यांचा सहभाग नोंदविण्यासाठी या समितीमध्ये मराठवाडयातील प्रत्येक जिल्हायातील एक किंवा दोन प्रतिनिधी, डॉ. सौ. मंगला बोरकर (अभ्यासक), मुक्तीसंग्रामचा ज्यांनी विशेष अभ्यास केला असे नामवंत पत्रकार, विचारवंत, इतिहासकार, वास्तुविशारद व त्यांचेकडील विद्युत विषयक तज्ञ, शहर अभियंता (तांत्रिक सल्लागार व सदस्य सचिव) यांचा समावेश आहे. सदर समितीची दिनांक १२/०८/२०११ रोजी मा. महापौर, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सदरील बैठकीत या प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या बाबी व प्रकल्पाचे स्वरुप यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला.

सदरील संग्रहालय हे नव्या पिढीला, शहरातील नागरीक, पर्यटक व विद्यार्थी यांना मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे कार्य तसेच हुतात्म्याचा इतिहास कायम स्वरुपी

लक्षात राहावा या उद्देशाने उभारण्यात येणार असल्याने त्या सदर्भात संग्रहालयाचे ठिकाण व कायदेशीर बाबी संदर्भाने सांगोपांग चर्चा होऊन निर्णय होणेसाठी दिनांक २०/०८/२०११ रोजी मा. महापौर, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे दालनात बैठक घेण्यात आली. सदरील बैठकीस मा. महापौर, मा. सभागृह नेता, मा. आयुक्त, शहर अभियंता, सहाय्यक संचालक नगर रचना (प्रभारी) विधी सहाय्यक, उप अभियंता तथा स्वीय सहाय्यक शहर अभियंता उपस्थित होते. या बैठकीत सिध्दार्थ उद्यान येथे उद्यानाच्या जागेत **मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय** बांधता येईल काय? या बाबत चर्चा झाली. तसेच मा. उच्च न्यायालयात असलेली याचिका क्रमांक ५७३०/२००७ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश या बाबतीत चर्चा झाली. सदरील याचिका ही आरक्षणात असलेले कोणतेही क्षेत्र वगळून त्याचा वापर बदलण्यात येऊ नये या संदर्भात आहे. तथापी सिध्दार्थ उद्यानात स्मृती स्तंभ हा यापूर्वीच शासनाने बांधलेला आहे. प्रत्येक वर्षी १७ सप्टेंबर हा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणुन साजरा केला जातो व या कार्यक्रमास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन व इतर खात्याचे मंत्री व बहुतांशी स्वातंत्र्य सैनिक व शहरातील नागरीक देखील उपस्थित असतात. १७ सप्टेंबर हा दिवस पावसाळयातच असतो त्यामुळे स्वातंत्र्य सैनिक यांना तसेच उपस्थित पर्यटक व नागरीक यांना कार्यक्रमाच्या वेळी कोणताही त्रास होऊ नये त्याच बरोबर मुक्ती संग्राम दिनात स्वातंत्र्य सैनिकाचे कार्य तसेच हुतात्म्यांचा इतिहास कायम स्वरुपी लक्षात राहावा यासाठी त्या दिवसाचे महत्व लक्षात घेता मुक्तीसंग्राम संग्रहालय बांधणेस हरकत नाही कारण याचा उपयोग हा केवळ सार्वजनिक वापरासाठी असून कोणताही वाणिज्य अथवा तत्सम वापर प्रस्तावित नाही. त्यामुळे उद्यानाचे वापरास कोणत्याही प्रकारची बाधा येत नाही.

तथापी कायदेशीर कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी उपरोक्त याचीकेशी संबंधीत महानगरपालिकेचे विधीज्ञ श्री. संजय एन. पगारे यांचा अभिप्राय घेण्यात आला. त्यानुसार मा. आयुक्त, यांनी शिफारस केली आहे. त्या अभिप्रयाची प्रत प्रस्तावा सोबत सादर करण्यात येत आहे. त्या आधारे मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय हे दोन टप्यात उभारण्याचे प्रस्तावित आहे.

०१. संग्रहालयाच्या स्थापत्य बांधकामासाठी १०००० चौ.फुटाचे बांधकाम करणे.

०२. मुक्ती संग्रामातील सेनानींचे फोटो, त्या बाबतची सविस्तर माहिती देणे, काही जिवंत स्वरुपाचे वाटणारे देखावे निर्माण करणे, संग्रहालयात येणाऱ्या पर्यटकांना मराठवाडा मुक्ती संग्रामाची सविस्तर माहिती होण्यासाठी किमान २० मिनिटांचा लघुपट तयार करणे आणि दररोज दाखविण्यासाठी अदयावत ध्वनी व विदयुत व्यवस्थेची कामे करणे.

वरील नूसार प्रथम टप्याच्या करावयाच्या स्थापत्य बांधकामासाठी चालु दरसुचिनूसार अंदाजे रक्कम रु. १.०० कोटी तसेच दुसऱ्या टप्यातील वरील नुसारच्या कामासाठी अंदाजे १.०० कोटी असे एकत्रित रक्कम रु. २.०० कोटी मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वीत होण्यासाठी लागणार आहे.

परंतू सद्यस्थितीमध्ये अर्थसंकल्प सन २०१०-२०११ नूसार प्रस्तावित प्रकल्पासाठी रक्कम रु. ५०.०० लक्षाची तरतुद उपलब्ध असून पहिल्या टप्यातील स्थापत्य बांधकामासाठी आवश्यक असणारी उर्वरीत ५०.०० लक्षची आर्थिक तरतुदीची तजविज सुधारीत अर्थसंकल्पात करणे आवश्यक आहे.

करीता मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय प्रकल्पाचे प्रथम टप्पयातील स्थापत्य कामे तातडीने सुरु करणेसाठी रक्कम रु. १.०० कोटी पर्यंतच्या कामाची निविदा काढणे, उर्वरीत कामांसाठी सुधारीत अर्थसंकल्पात आर्थिक तरतुदीची तजविज करणे तसेच मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी नियुक्त समितीच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनेनूसार कार्यवाही प्रस्तावित करणे बाबतचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम संग्रहालय उभारणे प्रकल्पाचे प्रथम टप्प्यातील स्थापत्य कामे करण्यासाठी प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे रक्कम रूपये १.०० कोटी पर्यंतच्या कामाची निवीदा काढणे, उर्वरित ५० लक्षाची तरतुद सुधारीत अर्थसंकल्पात करणे असे एकुण २.०० कोटी रक्कम मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय पुर्ण कार्यान्वित होण्यासाठीच्या लागणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात येते. तसेच मराठवाडा मुक्तीसंग्राम संग्रहालय प्रकल्प कार्यान्वित करणेसाठी नियुक्ती समितीच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनेनुसार कार्यवाही प्रस्तावीत करणे बाबतचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देणेबाबतही मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८०** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि., प्लॉट क्र. डी-5, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद यांनी आपसातील सामंजस्य करार (MOU) तत्वावर सर्वे क्र. 708, 709 व 713 मधुन जाणारा व जालना रोडला येऊन मिळणारा एकुण 550 मी. लांबीचा पालिका हद्दीतील 24 मी.रुंद विकास योजना रस्ता विकसीत करण्यासाठी परवानगी मागीतलेली आहे. सदरची त्यांनी मागितलेली परवानगी महाराष्ट्र शासनाच्या IT/ITES Policy-2009 मधील धोरणाशी सुसंगत आहे. महाराष्ट्र शासनाच्या IT/ITES Policy-2009, पृष्ठ क्र.7, मुद्दा क्र.10 मध्ये To supplement infrastructural investment by the State Government and urban local bodies, developers of private IT parks will be permitted to establish high quality road connectivity to the highways. Such roads will be transferred by the developers to the urban local bodies, and the investments made by the developers would be adjusted against the property tax payable to the local bodies in future अशी तरतुद आहे. त्यानुसार विकासकाने केलेली मागणी योग्य व शहराच्या औद्योगीक विकासाला हातभार लावणारी आहे. अशा प्रकारे शहरातील रस्ते विकसीत करण्यासंबंधी सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 421/07 दिनांक 25.09.2006 नुसार धोरण ठरविण्यात आलेले आहे. तसेच अशा प्रकारचा एक प्रकल्प सर्वसाधारण सभा दिनांक 20.02.2010, विषय क्र. 1019 आणि स्थायी समिती सभा दिनांक 11.02.2010, विषय क्र. 377 नुसार मिळालेल्या मंजुरीप्रमाणे सध्या पुर्णत्वाच्या मार्गावर आहे. सदरचा प्रस्तावीत 24 मी. रुंद विकास योजना रस्ता चिकलठाणा येथील रहिवाशी श्री हिरामण रा. रिठे व शांतीलाल रिठे व इतर यांच्या मालकीच्या शेत जमिनीतुन जात असून, त्यांनी विकासकाने दिलेल्या पत्रासोबत पत्र देऊन वरील नमुद प्रमाणे त्यांचे जमीनीतुन रस्ता तयार करणेसाठी या रस्त्याचा मोबदला रोख स्वरुपात देण्याच्या अटीवर तत्वत: प्राथमिक लेखी संमती दिली आहे.

सदर रस्ता राष्ट्रीय मानकानुसार (IRC Standard) विकसीत करावयाचा असून, यामध्ये 24 मी.रुंद विकास योजना रस्ता विकसीत करणे, रस्त्याच्या दोन्ही बाजुला पादचारीसाठी फुटपाथ बांधणे, मध्यभागी रस्ता दुभाजक बांधणे, पथदिवे उभारणे, आवश्यक ठिकाणी वाहतुक नियंत्रक उभारणे, आवश्यकतेनुसार विद्युत पोल व दुरध्वनी खांब उभारणे, आवश्यकतेनुसार विद्युत पोल अथवा दुरध्वनी खांब रस्त्याच्या भागात येत असल्यास हटवुन घेणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सार्वजनिक बांधकाम दरसूची सन 2011-12 नुसार रस्ता विकसीत करणे या कामासाठी अंदाजपत्रकीय किंमत रुपये 4,74,79,143/- होत आहे. तसेच ज्यांच्या मालकीच्या जमिनीतुन सदर 24 मी. रुंद रस्ता जात आहे, त्यांना जर मोबदला द्यावयाचा झाल्यास तो सिद्धशिघ्रगणक दरानुसार आकारणी करुन द्यावा लागेल. म्हणजेच सदर प्रकल्पाची एकुण किंमत रक्कम रुपये 4,74,79,143/- अधिक जमीनीची किंमत अशी जी काही एकुण रक्कम होईल तेवढी होईल.

सदरील रस्ता आपसातील सामंजस्य करार तत्वावर (MOU) करण्यात येणार असून, या प्रकल्पाचा सर्व खर्च विकासक प्रथम करणार आहे. सदरचा प्रकल्प बी.ओ.टी. धर्तीवरील असून, या मध्ये या रस्ता विकासाच्या कामावर विकासकास येणारा संपूर्ण खर्च (10% व्याजासह) महानगरपालिकेकडून आकारण्यात येणा-या मालमत्ता कराच्या स्वरुपात समान वार्षीक हप्त्यात समायोजीत करण्यात येईल. चिकलठाणा औद्योगीक वसाहत शहराचा एक महत्वाचा भाग असून, शहराच्या वाढत्या औद्योगीकरणामुळे या भागात मोठमोठ्या वसाहती, शॉपींग मॉल इत्यादी झपाट्याने विकसीत होत आहेत.

विकासकाने सादर केलेल्या प्रस्तावास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन मंजुरी प्रदान करणे योग्य वाटते.

1. या प्रकल्पासाठीचा करार हा मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि., प्लॉट क्र. डी-5, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद या नावाने करण्यात येणार असून, या प्रकल्पाशी संबंधीत पत्रव्यवहार, करारनामा व कार्यालयीन औपचारीकता मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि. यांचे सोबत पूर्ण करण्यात येईल.
2. सदर रस्ता प्रकल्प पुर्ण करण्यासाठी विकासकास प्रत्यक्षात जेवढा खर्च येईल त्या प्रकल्प खर्चाच्या रक्कमेवर दरसाल दर शेकडा 10% व्याज प्रकल्पाचा कालावधी संपे पर्यंत (प्रकल्पाची पुर्ण रक्कम समायोजीत होईस्तोवर) देण्यात येईल. ही व्याजाची रक्कम मालमत्ताकरापोटी समायोजीत करण्यात येईल.
3. सदरचा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर विकासकास पहिली तीन वर्षे या रस्त्याची सर्व देखभाल दुरुस्ती विनामुल्य करावी लागेल. पहिल्या तीन वर्षानंतरचा देखभाल दुरुस्तीचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ठ करण्यात येईल. तथापी हा खर्च कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व वार्ड ब/क यांचे कडून प्रमाणीत करुन घेणे विकासकास बंधनकारक राहील.
4. सदर रस्त्याचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विकासक मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि. आणि त्यांचे भागीदार इत्यादी जो काही खर्च करतील त्या खर्चाचे 100% समायोजन त्यांच्या मालकीच्या मालमत्तांवर आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता करातुन करण्यात येईल. तथापी सदर समायोजन लवकरात-लवकर व्हावे या करीता विकासक मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि. यांचे सह त्यांचे भागिदार सदर प्रस्तावीत रस्त्या लगतच्या मालमत्तांवर जे प्रकल्प उभे करतील त्या मालमत्तांवर लागणाऱ्या मालमत्ता करातून देखील 100% समायोजन

करण्यात येईल. तथापी त्यासाठी मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि. यांची सहमती (Consent) आवश्यक असेल.

5. मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि. विकसीत करतील त्या प्रकल्पाची नगर रचना विभागातुन जेव्हा बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्र घेतील त्यावेळी त्यांना आकारण्यात येणारे शुल्क उदा. शहर विकास निधी (CDC), जमीन विकास शुल्क (LDC), अनामत रक्कम, बांधकाम परवानगी तपासणी शुल्क, बेटरमेंट चार्जेस (विकास खर्च) इत्यादी रक्कमेचे समायोजन देखील या प्रकल्पाच्या खर्चातुन करण्यात येईल, जेणे करुन रस्ता विकास खर्चाचे समायोजन लवकरात-लवकर होईल. तथापी सदर समायोजन रस्त्याच्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतरच करण्यात येईल. अशा प्रकारचे समायोजन मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि. अणि त्यांच्या भागीदारीतील कंपन्या, संस्था किंवा प्रोजेक्ट असोसिएट्स जे या रस्त्यालगत प्रकल्प उभारतील त्यांच्या मालमत्तांबाबत ही करता येईल.

6. सदरच्या 24 मी. रुंद विकास योजना रस्त्याखालील जागा आणि सर्व उपांगासह विकसीत रस्ता नोंदणीकृत दस्ताद्वारे महानगरपालिकेच्या मालकीहक्कात हस्तांतरीत करुन द्यावा लागेल. म्हणजेच या हस्तांतरणानंतर या रस्त्यावर महानगरपालिकेची निर्विवाद मालकी प्रस्थापीत होईल. तसेच भविष्यात या रस्त्यास इतर सार्वजनिक रस्ते जोडायचे झाल्यास तसे रस्ते पुर्व परवानगीने जोडण्याची परवानगी देण्यात येईल. तथापी ही बाब संपुर्णतः महानगरपालिकेच्या मंजुरीच्या अधिन असेल.

7. काम करीत असतांना किंवा काम पुर्ण होई पर्यंतच्या कालावधीत प्रकल्पातील गृहीत बाबी व्यतिरिक्त काही अतिरिक्त बाबी अचानक समोर आल्यास व त्या अतिरिक्त बाबींची कामे करणे आवश्यक असल्यास त्यावरील खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ठ करण्यात येईल तसेच ज्या बाबींची कामे होणार नाहीत त्यांचा खर्च प्रकल्प खर्चातुन वजा करण्यात येईल. याबाबत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व वार्ड ब/क यांची मंजुरी आवश्यक असेल, तसेच या प्रकल्पाच्या वाढीव बाबींवर होणारा खर्च कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व वार्ड ब/क यांच्या कडुन प्रमाणीत करुन घेणे बंधनकारक राहील.

8. प्रकल्पावर होणारा संपुर्ण खर्च अधिक व्याजाची 10% रक्कम वार्षीक पध्दतीने समान हप्त्यात विकासकाला लागलेला खर्च वसुल होई पर्यंत मालमत्ता करापोटी समायोजीत करण्यात येईल.

9. भविष्यात चिकलठाणा औद्योगीक वसाहतीचा भाग औद्योगीकनगर वसाहत म्हणुन घोषीत झाला तरी करण्यात येणा-या आपसातील सामंजस्य करारानुसार महानगरपालिका औरंगाबाद कार्यवाही कायम ठेवील.

10. या 24 मी. रुंद रस्त्यावरील सर्व प्रकारच्या जाहीरातीच्या माध्यमातुन मिळणारा महसुल जो पर्यंत या रस्त्याची दुरुस्ती विकासकाकडे राहील त्या मर्यादीत कालावधी पर्यंत इन्सेटीव्ह म्हणुन वसुल करण्याचे अधिकार विकासकाकडे राहतील. तथापी सदर रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही व हा रस्ता नेहमी अतिक्रमण मुक्त राहील याची व सदर रस्ता सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ही विकासकाची राहील. याबाबत आवश्यकता भासल्यास महानगरपालिका औरंगाबाद योग्यते सहकार्य

विकासकास करील.

11. या रस्त्यावरील पथदिव्यांची उभारणी आणि पथदिव्यांचे सनियंत्रण विकासक करील मात्र रस्त्यावरील पथदिव्यांचे वीज बील महानगरपालिका अदा करील. तथापी प्रकाशयुक्त जाहीरातींसाठी लागणारा विजेचा खर्च / विजेचे बिल विकासकास अदा करावे लागेल. त्यासाठी विकासकाने स्वतंत्र विज मिटर घेणे बंधनकारक राहील. तसेच किासकांतर्फे या रस्त्यावर उभारण्यात येणा-या वाहतुक नियंत्रकांचा / पथदिव्यांच्या उभारणीचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ठ करण्यात येईल. या पथदिव्यांची व वाहतुक नियंत्रकांची उभारणी केल्यापासुन विकासकास पहिली तीन वर्षे देखभाल दुरुस्ती विनामोबदला करावी लागेल. तीन वर्षानंतर होणा-या देखभाल दुरुस्तीचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ट करण्यात येईल. तथापी हा खर्च कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व वार्ड ब/क यांचे कडुन वेळोवेळी प्रमाणीत करुन घेण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

12. चालु दरसुचीनुसार (वर्ष 2011-2012) प्रकल्पाची एकुण किंमत रुपये 4,74,79,143/- स्विकारण्यास हरकत नाही. यात प्रकल्पासाठी आवश्यक जमीन संपादनाच्या किंमतीचा समावेश नाही. त्यामुळे रुपये 4,74,79,143/- अधिक जमीनीची किंमत अशी एकुण जी काही रक्कम असेल तेवढी प्रकल्पाची किंमत असेल.

13. या रस्त्यावर सद्यस्थितीत असलेली सर्व प्रकारची कच्ची/पक्की अतिक्रमणे हटविण्यासाठी महानगरपालिका सहकार्य करेल.

14. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर व देखभाल दुरुस्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्रकल्पाची सर्व उपांगे, रस्त्याखालील जागा इत्यादी (संपूर्ण विकसीत प्रकल्प) अतिक्रमण विरहीत स्थितीत महानगरपालिकेकडे सुस्थितीत हस्तांतरीत करावे लागेल.

15. या प्रकल्पात समाविष्ट सर्व प्रकारची कामे IRC/ISI/MORTH/NBC च्या मानकाप्रमाणे पुर्ण करावी लागतील. यासाठी महानगरपालिका औरंगाबाद निर्देशीत करेल त्यानुसार सर्व आवश्यक चाचण्या विकासकाला स्वखर्चाने देणे/करुन घेणे बंधनकारक राहील.

16. या प्रकल्पाची सर्व कामे महानगरपालिका औरंगाबादच्या मार्गदर्शनाखाली व निगराणी खाली पुर्ण करावी लागतील.

17. प्रकल्पाचा संपुर्ण प्रगती अहवाल वेळोवेळी म्हणजेच प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर तसेच देखभाल दुरुस्तीचा पहिल्या तीन वर्षांचा कालावधी पुर्ण होई पर्यंत नियमीत लेखी स्वरुपात विकासकाने महानगरपालिकेस देणे आवश्यक राहील.

18. केलेल्या कामाची नोंद ठेवणे, कामाची परिमाणे नोंदविणे, काम योग्य मानकानुसार होण्यासाठी तसेच दक्षता व गुणनियंत्रणासाठी कामावर स्वतंत्र प्रकल्प संकल्पनार्थी (Project Management Consultant ) नेमण्यात यावा.

19. या कामासाठी योग्य अशा अनुभवी कंत्राटदाराची नेमणुक विकासकाने करावी, जेणे करुन प्रकल्पाचा विकास सुयोग्य पध्दतीने होईल.

20. रस्त्याची / प्रकल्पाची सर्व उपांगे इत्यादींची देखभाल दुरुस्ती MORTH Mannual मधील तरतुदींप्रमाणे करावी लागेल. तसेच रस्त्याला आवश्यकतेनुसार दर पाच वर्षांनी Renewal coat करावा लागेल.

21. सदरचा 24 मि. रुंद विकास योजना रस्ता ज्या मालकांच्या / व्यक्तिंच्या खाजगी शेत जमिनीतुन जात आहे, त्यांना या रस्त्याच्या जागेचा मोबदला महानगरपालिक्ेला देणे शक्य न झाल्यास आणि अशा परिस्थितीत सदर जमिन मालक स्वखुशीने टी.डी.आर. स्वरुपात या रस्त्याखालील जमिनीचा मोबदला घेण्यास तयार असल्यास असा मोबदला टी.डी.आर. स्वरुपात महानगरपालिकेतर्फे देण्यात येईल किंवा महानगरपालिकेने या रस्त्याचा मोबदला सिद्धशिघ्रगणक दराप्रमाणे ठरवावा आणि असा मोबदला संबंधीत विकासक परस्पर जमिन मालकास देण्यास तयार असल्यास विकासकास तशी मुभा राहील.

22. सदरचा रस्ता काम सुरु करण्यापूर्वी प्रत्यक्ष जागेवर नगर रचना विभागाकडुन / सक्षम कार्यालयाकडुन आखणी करुन घेणे बंधनकारक राहील.

23. रस्त्याचा मोबदला देणे व रस्त्याची आखणी करण्यासाठी तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांचे कडे रस्त्याच्या आखणीसाठी शुल्क भरणेसह येणारा संपूर्ण खर्च प्रकल्पावर होणा-या विकास खर्चात समाविष्ट करण्यात येईल.

24. महानगरपालिकेने सिद्धशिघ्रगणक दराप्रमाणे ठरविलेला जमिनीचा मोबदला विकासक जर संबंधीत जमिन मालकास परस्पर देण्यास तयार असेल तर प्रकल्पावर येणा-या एकुण खर्चात या जमीन मोबदल्याच्या रक्कमेचा समावेश करण्यात येईल. त्यानुसार प्रकल्पाच्या एकुण खर्चाची रक्कम (10% व्याजासह) मालमत्ता करातुन समायोजीत करण्यात येईल.

तरी उक्त नमुद अटी/शर्ती प्रमाणे प्रकल्पाची अंमलबजावणी करणे योग्य वाटते. चिकलठाणा औद्योगीक वसाहत शहराचा एक महत्वाचा विकसनशिल भाग असून, वाढत्या औद्योगीकरणामुळे या भागात अनेक नागरी वसाहती, शॉपींग मॉल, हॉटेल्स इत्यादी झपाट्याने विकसीत होत आहेत. महानगरपालिकेला डी.पी. रस्त्यांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुदीं अभावी / आर्थिक अडचणींमुळे अधिक कालावधी लागतो. तसेच मोठी आर्थिक गुंतवणुकही करावी लागते. औरंगाबाद महानगरपालिका ही एक सेवाभावी संस्था असल्याने विज, पाणी, ड्रेनेज इत्यादी अत्यावश्यक सुविधेला प्रथम प्राधान्य द्यावे लागते. त्यामुळे आर्थिक तरतुदी अभावी महानगरपालिके कडुन मोठ्या विकास योजना रस्त्यांची कामे करण्यास मर्यादा येते व त्यामुळे रस्ते विकासासाठी विलंब होतो. सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुदृढ नाही. त्यामुळे उपरोक्त नमुद केलेल्या रितीने रस्त्याचा विकास होण्यासाठी विकासकाने दिलेला प्रस्ताव मान्य करणेस हरकत नाही.

विकासकास सदरचा रस्ता राष्ट्रीय मानकानुसार विकसीत करावयाचा असून, यासाठी विकासक सुरुवातीला स्वत:ची मोठी रक्कम या रस्त्यासाठी खर्ची घालणार आहे. नियोजनपुर्वक रस्ता विकसीत करण्यात येणार असल्याने या भागातील भविष्यांतील सर्व सोयी सुविधांचा यात विचार करण्यात आलेला आहे. त्यामुळे एकुण 550 मी. लांबीचा रस्ता

आपसातील सामंजस्य करार (MOU) पध्दतीवर हाती घेणे व विकासकाने सादर केलेल्या प्रस्तावाला मंजुरी देणे योग्य वाटते.

करीता विकासकाने सादर केलेल्या या प्रस्तावास तसेच अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 4,74,79,143/- आणि जमीन संपादनासाठी नियमाप्रमाणे जी काही रक्कम (सिद्धशिघ्रगणक दराप्रमाण) येईल त्या रक्कमेसह एकुण प्रकल्पाच्या किंमतीस मान्यता देणे तसेच उक्त अटीं/शर्तींना आणि प्रकल्पावर खर्ची पडणारा विकासकाचा एकुण खर्च अधिक 10% व्याज हे विकासकास दरवर्षी जेवढा मालमत्ता कर लागेल त्या मालमत्ता कराच्या 100% समान वार्षीक हप्त्याच्या स्वरुपात समायोजीत करण्यास तसेच विकासकाने प्रकल्पावरील केलेला एकुण खर्च (10% व्याजासह) वसुल होई पर्यंतच्या कालावधीसाठी मालमत्ता करातुन समायोजीत करणेस मान्यता देणे तसेच सदरचा प्रस्तावीत रस्ता ज्यांच्या जमिनीतुन जातो त्या सर्व जमीन मालकांना त्यांच्या जमिनीचा मोबदला सिद्धशिघ्रगणक दराप्रमाणे (Ready Reckoner) अदा करण्यास किंवा महानगरपालिकेने सिद्धशिघ्रगणक दराप्रमाणे जमीन मालकास द्यावयाचा जमिनीचा मोबदला जर विकासक संबंधीत जमिन मालकास परस्पर द्यावयास तयार असेल तर त्यांनी हा मोबदला दिल्यावर त्या मोबदल्याची किंमत प्रकल्प खर्चात समाविष्ट करण्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव किंवा ज्या जमिन मालकास टी.डी.आर. (Transfer of Development Rights) हवा असेल तर त्या जमिन मालकांस असा टी.डी.आर. देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि., प्लॉट क्र. डी-5, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद यांनी आपसातील सामंजस्य करार (MOU) तत्वावर सर्व्हे क्र. 708, 709 व 713 मधुन जाणारा व जालना रोडला येऊन मिळणारा एकुण 550 मी. लांबीचा पालिका हद्दीतील 24 मी.रुंद विकास योजना रस्ता विकसीत करणे, रस्त्याच्या दोन्ही बाजुला पादचाऱ्यांसाठी फुटपाथ बांधणे, मध्यभागी रस्ता दुभाजक बांधणे, पथदिवे उभारणे, आवश्यक ठिकाणी वाहतुक नियंत्रक उभारणे, आवश्यकतेनुसार विद्युत पोल व दुरध्वनी खांब उभारणे, आवश्यकतेनुसार विद्युत पोल अथवा दुरध्वनी खांब रस्त्याच्या भागात येत असल्यास हटवुन घेणे किंवा काम करीत असतांना जागेवरील परिस्थितीनुसार उद्‌भवणा-या अतिरिक्त बाबी करुन घेण्यास आणि रस्ता तयार करण्यासाठी आवश्यक भुसंपादनापोटी होणा-या खर्चास म्हणजेच प्रकल्पाची सिव्हील आणि इलेक्ट्रिकलची कामे करण्यासाठीची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 4,74,79,143/- ला आणि भुसंपादनासाठी लागणा-या एकुण संभाव्य रक्कमेला अशा प्रकारे अंदाजपत्रकीय रक्कम आणि भुसंपादनाची रक्कम मिळून एकत्रीत प्रकल्प किंमतीस तसेच विकासकाने केलेल्या संपूर्ण खर्चाची परतफेड होई पर्यंत झालेल्या खर्चापोटी दरवर्षीचा देय 100% मालमत्ता कर समायोजीत करण्यास तसेच सदर समायोजन लवकरात-लवकर व्हावे या करीता विकासक मे. अजंठा इन्फास्ट्रक्चर्स लि. यांचे सह त्यांचे भागिदार सदर प्रस्तावीत रस्त्या लगतच्या मालमत्तांवर जे प्रकल्प उभे करतील त्या मालमत्तांवर लागणाऱ्या मालमत्ता करातून देखील 100% समायोजन करण्यास, प्रस्तावातील अ.क्र. 01 ते 24 मध्ये नमुद केलेल्या अटीं व शर्तींच्या अधीन राहुन मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा** :

श्री.त्रिंबक तुपे :सायलेन्स झोनचा सर्वे करण्यात आला १९०-१९५ ठिकाणी महापालिकेने अतिशय चुकीचा सर्वे करून शासनाकडे दिला यादी बघीतली तर शाळेचा हॉस्पीटला संबध येत नाही अशा ठिकाणचे भाग दिले सर्वे केलेला भाग राहिला तर येणा-या काळात कोणताही धार्मीक कार्यक्रम व उत्सव करता येणार नाही.यादीनुसार ९५ टक्के शहर बाधीत होते.मुंबई पुणे बघीतले तर १० टक्केच भाग हा सायलेन्स झोनच्या मध्ये येतो.एक ठराव करून निवासी भागात शाळा ,हॉस्पीटल झाले असेल तर तेथे असलेले धार्मीक स्थळ तेथील कार्यक्रम उत्सव बंद करणार का यात तेथील निवासी नागरीकांची चुक नाही शाळा , हॉस्पीटल यांनी त्या ठिकाणी परवानगी घेतली की नाही हे सुध्दा तपासले जावे एक चांगल्या प्रकारे सर्वे स.सदस्यांना तेथील नागरीकांना विश्वासात घेवून सर्वे करावा व आपल्या माध्यमातून शासनाकडे पाठववा ही विनंती.

मा.महापौर :मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेने शहरातील शातंता क्षेत्राची यादी जाहिर व अंतिम करून पोलीस प्रशासनाकडे सादर केली परंतु असे निदर्शनास आले की ही यादी तयार करीत असतांना त्यामध्ये बरीच मतभिन्नता आहे.त्यामूळे या वर्षीच्या नवरात्र महोत्सवामध्ये नवरात्र मंडळांना व दांडिया आयोजकांना सदरील प्रस्तावित सायलेन्स झोनच्या त्या नावाच्या भागाच्या यादीमूळे पोलीस प्रशासनाला परवानगी देतांना अडचणी निर्माण झाल्या पोलीस प्रशासन व महापालिका तसेच मा.आमदार व मा.खासदार यांचे प्रयत्नामूळे परवानगीचा तात्पुरता मार्ग मोकळा झाला त्याअनुषगाने सभागृहाच्या भावना लक्षात घेता आदेशीत करण्यात येते की जी सायलेन्स झोनची यादी आहे ती तात्पुरती स्थगित करण्यात यावी व सायलेन्स झोनचे पुन्हा सर्वेक्षण करून मा.उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व निकषानुसार अधारीत व वस्तुनिष्ठ अहवालावर अधारीत यादी तयार करून महापालिकेच्या सक्षम सभागृहासमोर ठेवून ती अंतिम करण्यात यावी व तदनंतरच मा.पोलीस आयुक्त व राज्य शासन तसेच मा.उच्च न्यायालयाकडे सादर करण्यात यावी.

श्री.राजू शिंदे :शाळा बाहय मुलाच्या बाबतीत माझा प्रश्न आहे तो पुढील बैठकीच्या वेळी घेण्यात यावा.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (२७)

दिनांक २९/०९/२०११ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेत विचारण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.९६ अन्वये.

**प्रश्नांची यादी**

**विरोधी पक्ष नेता श्री.प्रमोद प्र.राठोड:**

**प्रश्न क्र.८०:** . औरंगाबाद महानगरपालिका, नगर रचना विभागामधील औरंगाबाद शहरातील बांधकाम परवानगी / भोगवटा प्रामणपत्र संचिका गहाळ प्रकरणांत संबंधित अधिकाऱ्याने पोलीसात दाखल केलेली तक्रार मा.आयुक्तांना योग्य वाटते का.? खुलासा करावा.

**उत्तर :-** अप्राप्त

**प्रश्न :-** औरंगाबाद महानगरपालिका, नगर रचना विभागामधील औरंगाबाद शहरातील बांधकाम परवानगी / भोगवटा प्रामणपत्र संचिका गहाळ प्रकरणांत संबंधित अधिकाऱ्याने पोलीसात दाखल केलेली तक्रार मा.आयुक्तांना योग्य वाटते का.? खुलासा करावा

**उत्तर :-** अप्राप्त

**प्रश्न क्र.८१:** औरंगाबाद महानगरपालिका, नगर रचना विभागामधील औरंगाबाद शहरातील बांधकाम परवानगी / भोगवटा प्रमाणपत्र संचिका गहाळ प्रकरणांत संबंधित अधिकाऱ्याने अशा प्रकारे गोलमोल तक्रार पोलीसात दाखल केलेली आहे या बाबत मा.आयुक्त संबंधित अधिकाऱ्या विरुध्द कोणती कार्यवाही प्रस्तावित करणार आहेत? खुलासा करावा.

**उत्तर :-** अप्राप्त

**सभापती स्थायी समिती, श्री.राजू रामराव शिंदे:**

**प्रश्न क्र.८२:** उपरोक्त विषयी कळविण्यांत येते की, महापालिकेच्या शाळा संबंधीची खालीलप्रमाणे तक्त्यात दर्शविण्यांत आलेली माहिती उपलब्ध करुन देण्यांत यावी.

| एकूण शाळा किती | प्रत्यक्षात असलेली विद्यार्थी संख्या | शिक्षकांची संख्या | शाळा बाहय विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

मनपाच्या असलेल्या शाळेवर आजपर्यंत वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटी बाबतची माहिती व सर्व मुख्याध्यापक, सर्व शिक्षक यांचे वेतनावर होणारा मासिक / वार्षिक खर्च किती? विद्यार्थ्यांना देण्यांत येणारे गणवेश, बुट, टाय, सॉक्स यावर होणारा खर्च किती? इत्यादी तपशिलवार माहिती उपलब्ध करुन देण्यांत यावी.

तसेच शाळा बाहय मुले शोधण्यासाठी राबविण्यात आलेल्या योजनेमूळे शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे. या मुलांमधून नियमित किती मुले

प्रत्यक्षात शिक्षण घेतात, त्यांची संख्या किती आहे. तसेच शाळा बाहय मुलांच्या सर्वेक्षणासाठी किती खर्च झालेला आहे. शाळा बाहय मुलांच्या संदर्भात मनपाच्या शाळांना किती वेळेस भेट देऊन पाहणी करण्यांत आली.

**उत्तर** **:-** अप्राप्त

**स.सभागृह नेता, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे:**

**प्रश्न क्र.८३:**

रोपळेकर हॉस्पीटल ते चेतक घोडा पर्यंतच्या रस्त्याबाबत.

**प्रश्न** **:-** १.सदरील रस्ता मंजुर आहे का? सदरील कामास कधी मंजुरी दिली?

**उत्तर** :- सदरील रस्ता हा डिफर्ड पेमेंट अंतर्गत एकुण सहा रस्त्यापैकी सदर रस्ता मंजुर आहे. सदरील कामास आर्थिक वर्ष २००७ मध्ये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

**प्रश्न** **:-** २.कोणत्या एजन्सीस ठेका देण्यांत आला, ठेकेदाराचे नांव, कामाचे कार्यादेश केव्हा दिले, ठेकेदाराने केव्हा काम चालू केले व काम पूर्ण केले आहे काय?

**उत्तर** :- सदरील काम हे मे. जी.एन.आय.इन्फ्राट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद या एजन्सीस देण्यात आलेले आहे.तसेच सदर कामाचा कार्यादेश दिनांक २०.०६.२००७ अन्वये देण्यात आलेला आहे. सदरील रस्तयाची कामे माहे जानेवारी २०११ मध्ये चालु करण्यात आलेली असुन काम प्रगतीपथावर आहे.

**प्रश्न** :- ३.सदरील कामाचा कालावधी, ठेकेदाराने विहीत मुदती काम पूर्ण केले आहे काय, काम पूर्ण नसल्यास सदरील एजन्सीस पुन्हा दुसरा ठेका देण्यात आला आहे काय?

**उत्तर** :- सदरील काम पुर्णत्वाचा कालावधी हा १८ महिने होता,सदरील काम हे प्रगतीपथावर असुन आर्थिक तरतुद न मिळाल्यामुळे काम मुदतीत पुर्ण झालेले नाही. सदरील कामपुर्ण करणेसाठी मुदतवाढ मिळणे बाबत प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदरील एजन्सीस सन २०१०-११ मधील डिफर्ड पेमेंट धर्तीवर दुसरे काम निविदेव्दारे देयात आलेले आहे.

**प्रश्न** :- ४.काम पूर्ण झालेले नसेल तर मनपाने ठेकेदारावर कोणती कार्यवाही केली? संबंधीत ठेकेदाराचे किती / संपुर्ण देयक अदा करण्यात आले आहे काय?

**उत्तर** :- सदरील काम प्रगतीपथावर असुन संबंधीत ठेकेदारावर महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही तसेच रोपळेकर हॉस्पीटल ते चेतक घोडा पर्यंतच्या रस्त्याच्या कामाचे कोणतेही देयक गुत्तेदारास अदा करण्यात आलेले नाही.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद